Shree Nisargadatta Samadhi Charitable Trust, Mumbai
श्री निसर्गदत्त समाधी चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई द्वारा प्रकाशित त्रैमासिक

NISARGAVAANI

निसर्गवाणी ನಿಸರ್ಗವಾಣಿ निसर्गबानी

वर्ष २ रे अंक : ४ था (एप्रिल ते जून २०२६) Year 2nd Issue 4th (April - June 2026)

Without the Full understanding of Oneself, Both in Time and in Timelessness, Life is but a Dream imposed on us by Powers we don't know, for purposes we can't grasp.

-Maurice Frydman-

संपादक
डॉ. धीरज सर्वज्ञ : +91 9881314214
विजया नाझरे : +91 9403707936 स्मिता थोरात : +91 8698863395
तुषार नाईक : +91 8369105437 / 982188356

मुखपृष्ठ रचना: भरतभाई शिंपी, जळगाव
मांडणी आणि अंतर्गत सजावट
झेन प्रकाशन मुंबई (निसर्गवाणी समुहाकडून प्राप्त लेखादि साहित्या नुसार)
वेबसाईट: www.nisargdattasamadhi.in
ईमेल: nisargadattasamadhitrust2025@gmail.com

लेखकांना आवाहन

कोणत्याही मासिकाची पहिली आवश्यकता म्हणजे प्रतिथयश आणि होतकरू लेखकांकडून मासिकासाठी दर्जेदार लेख मिळविणे. आत्मज्ञान हा विषय कोणत्याही धर्म, जाती भेद या पलीकडचा आहे याचे कायम स्मरण बाळगून केवळ निसर्गदत्त महाराज यांच्या आत्मज्ञान शिकवणीचाच इथे अंतर्भाव न करता सोबत भारतातील संत-साधु यांची चरित्रे, त्यांची पारमार्थिक शिकवण, विविध संप्रदायातील पारमार्थिक शिकवण, पौराणिक कथा आदि अनेक लेखांचा आणि अर्थातच वाचकांचा प्रतिसाद आणि अभिप्राय याचाही निसर्गवाणी त्रैमासिकात समावेश करण्याचा उद्देश आहे. अध्यात्मज्ञान हे देश-कालातीत असे पवित्र ज्ञान आहे यावर आमची पूर्ण निष्ठा आहे.

उपयुक्त सूचना

या त्रैमासिकातील पृष्ठ संख्या मर्यादित ठेवण्याच्या दृष्टीकोनातून लेखकांना एक नम्र सूचना आहे की छोट्या लेखासाठी साधारण ७५० शब्द संख्या असावी, मध्यम आकाराच्या लेखा साठी साधारण १५५०० शब्द संख्या असावी आणि दीर्घ लेखासाठी साधारण २३०० पर्यंत शब्द संख्या असावी.

कृपया निसर्गवाणी त्रैमासिकाच्या खालील मेल आयडी वर आपले लेख पाठवावेत
nisargavaani240125@gmail.com

संपादकीय

श्री निसर्गदत्त महाराज आणि श्री जिद्दु कृष्णमूर्ती

श्री निसर्गदत्त महाराज आणि जे कृष्णमूर्ती हे दोन्ही तत्त्ववेत्ते त्यांच्या स्वरूपाने एकमेकांच्या पूर्णतः वेगळ्या दिशांनी आलेले भासतात. एक परंपरेतून, एक परंपरेनिरपेक्ष; एक अद्वैताचा उष्ण स्पर्श घेऊन येणारा, दुसरा विचाराला ज्वालाग्रही प्रश्नाच्या रूपाने कुठल्याही अध्यात्मिक चौकटीला आव्हान देणारा. पण त्यांच्या शिकवणीतील प्रत्यक्ष अनुभवाच्या स्तरावर गेल्यावर जाणवते की दोघे जण जणू वेगळ्या पर्वतशिखरांवरूनही एकाच मध्यबिंदूवर बोट ठेवतात. हा मध्यबिंदू म्हणजे "चेतनेचे शुद्ध निरीक्षण". दोघांच्या शिकवण्यातला हा सर्वांत खोल, साम्य धागा आहे. निरीक्षण हे साधन नसून मुक्तीचे स्वरूपच आहे. निसर्गदत्तांच्या भाषेत हा 'साक्षीभाव' म्हणून येतो तर कृष्णमूर्तींच्या भाषेत **'choiceless awareness'.**

दोघेही स्पष्ट करतात की असा निरीक्षणाचा क्षण हा कोणत्याही साधनांच्या, तंत्रांच्या, पद्धतींच्या पलीकडचा आहे; तो एक अविचल उपस्थितीचा क्षण आहे. त्यांच्या या शिकवणीतून हे स्पष्ट होते की मुक्ती ही भविष्यात मिळवायची गोष्ट नसून आत्ताच अनुभवता येणारी प्रज्ञेची तात्काळता आहे.

या दोघा संतांमध्ये साम्य दिसते ते त्यांच्या 'मी' या संकल्पनेच्या उकलण्यात. कृष्णमूर्तींसाठी 'मी' ही मनाच्या सुरक्षेची यंत्रणा आहे. भूतकाळाच्या स्मृती आणि भविष्याच्या आकांक्षांचा प्रवाह एकत्र येऊन बनलेले केंद्र. निसर्गदत्तांसाठी 'मी' ही 'I Am' या प्राथमिक अनुभूतीवर बसलेली एक कल्पना आहे. दोघेही स्पष्टपणे सांगतात की अनुभवातील मूळ जाणिव—'मी आहे' ही शुद्ध आहे, पण तिच्यावर घट्ट चिकटलेली 'मी अमुक-तमुक आहे' ही कल्पना दुःखाला जन्म देते. या दृष्टिकोनात दोघेही जण हिरिरीने अहंकाराच्या संरचनेचे विघटन करतात, आणि दोघेही यावर एकमत आहेत की हे विघटन कोणत्याही बाह्य प्रयत्नाने होत नाही; ते फक्त 'आपण' या संरचनेला स्पष्टपणे पाहिल्यावर स्वतःच कोसळते. त्यामुळे दोघांची आध्यात्मिक पद्धत मुळात 'काही करणे' नसून 'पाहणे' ही आहे. हे पाहणे जेव्हा प्रत्यक्ष घडते, त्या क्षणी मानसिक प्रतिमा आणि अहंकाराची पकड सैल होते; आणि जे उरते ते शुद्ध जागरूकतेचे अनंतत्व !

कृष्णमूर्तींच्या मनाविषयीच्या प्रश्नांची खोली इतकी तीक्ष्ण आहे की त्यांच्या श्रोत्यांना वारंवार असे वाटते की ते जणू मानसशास्त्राचा नवीन प्रदेश उघडत आहेत...एक असा प्रदेश जिथे मनाची हालचाल ही केवळ एक यांत्रिक प्रक्रिया म्हणून उलगडते. निसर्गदत्त महाराजदेखील या प्रक्रियेची उकल करतात, पण त्यांचा निसर्ग वेदांताचा आहे; ते चेतनेच्या मूळस्वरूपाची ओळख करून देतात. त्यांच्या संवादांत मन, बुद्धी, चित्त, अहंकार या सर्वांचे स्थान अत्यंत स्पष्टपणे समजावून सांगितलेले आहे. पण जिथे कृष्णमूर्ती विश्लेषणाचे शस्त्र वापरतात, तिथे निसर्गदत्त महाराज 'सत्स्वरूपाच्या प्रकाशा'चा वापर करतात. तरीही, दोघे जण मनाला एक उद्दिष्ट म्हणून नाही, तर एक वस्तू म्हणून पाहतात, ज्याचे निरीक्षण केले की त्याची मर्यादा स्पष्ट होते. या निरीक्षणातूनच दोघांच्या शिष्यांना मुक्तीचे द्वार दिसू लागते.

दोघांच्या शिकवणीतील अजून एक महत्त्वाचे साम्य म्हणजे भीतीचा शोध. भीती हा कृष्णमूर्तींचा विशेष अभ्यासाचा विषय आहे. ते सांगतात की भीती ही विचारांमधून निर्माण होते. भविष्यातील कल्पनांच्या आधारे तयार होणारी मानसिक प्रतिमा.

निसर्गदत्त महाराजांच्या दृष्टिकोनात भीती ही 'मी शरीर आहे' या मूलभूत ओळखीशी निगडित आहे. शरीर(व्यक्ती) नष्ट होईल, म्हणून 'मी' नष्ट होईन—अशी कल्पना भीतीला जन्म देते. पण जर 'मी' शरीर नाही, मन नाही, विचार नाही—जर 'मी' हे फक्त 'I Am' या स्वरूपाचे शुद्ध अस्तित्व आहे—तर भीतीला स्थानच राहत नाही. यामध्ये दोन्ही शिक्षकांचे निष्कर्ष अद्भुतपणे एकत्र येतात. भीती ही मनाच्या कल्पनेतून येते; तिच्या मूळाला पाहिले की ती वितळते. दोघांचाही आग्रह आहे की भीतीवर मात करण्यासाठी तिला सामोरे जा. तिच्यापासून पळू नका. तिच्याकडे पाहताना तिचा प्रवाह उलगडतो, आणि त्यातून स्वातंत्र्याची दारे आपोआप उघडतात.

दोघांच्या शिकवणीत प्रेमाविषयी एक अंतःस्थ, लक्षणीय साम्य आहे. कृष्णमूर्ती; प्रेमाला अटी, अपेक्षा, आणि मानसिक प्रतिमांपासून पूर्णपणे मुक्त राज्य म्हणतात. प्रेम हे 'मी' नसताना उमलते. निसर्गदत्त महाराज देखील प्रेमाला 'अद्वैता'चे स्वरूप मानतात. जिथे दुसरा कोणी नाहीच. दोघांसाठी प्रेम ही भावना नसून एक चेतनेची अवस्था आहे. ही अवस्था 'मी'च्या ऱ्हासातुन निर्माण होते. 'मी आहे' ही अनुभूती शुद्ध झाल्यावर 'मी आणि तू' यातील विभाजनच उरत नाही, आणि त्यातून सर्वव्यापी प्रेम आपोआप प्रकटते. त्यामुळे त्यांच्या प्रेमाच्या भाषेत भावनिकता नाही; ती अस्तित्वाच्या सत्याशी जोडलेली आहे.

भाषिक दृष्टीने पाहिले तरी त्यांच्या शिकवण्यात एक साम्य दिसते. कृष्णमूर्तींची भाषा आधुनिक मनोविज्ञान आणि तत्त्वचिंतनातून आलेली, तर निसर्गदत्त महाराजांची भाषा ग्रामीण मराठी आणि शास्त्रीय संस्कृत तत्त्वांनी, सूत्रांनी रंगलेली. पण या दोन्ही भाषांचा हेतू एकच..मनाच्या पलीकडच्या त्या जागेची अनुभूती करून देणे.

अवलोकनाद्वारे शब्दांच्या निरर्थक तिकडे आणि फसवेगिरीकडे कृष्णमूर्ती निर्देश

करतात. निसर्गदत्त शब्दांच्या अपूर्णतेकडे निर्देश करतात. दोघेही म्हणतात की शब्द सत्य नाही; शब्द म्हणजे बोट. पण बोटाचा हेतू चंद्राकडे दाखवण्याचा आहे. त्यांच्या संवादांत शब्द वापरले जातात, पण ते शब्द पारदर्शक आहेत,त्यातून दिसते ते अंतःचेतनेचे प्रकाशन.

दोघांची शिकवण 'आता'.. 'या क्षणाच्या' महत्त्वावर साधारणपणे एकाच तत्त्वावर उभी आहे. कृष्णमूर्तींसाठी 'Now' हा केवळ 'काल क्षण' नाही.तो मनाच्या निरंतर कार्यापासून मुक्त झालेला एक विस्तृत अवकाश आहे.

निसर्गदत्तांसाठी 'आता' म्हणजे 'मी आहे' ही अनुभूती,ज्यात भूतकाळ नाही, भविष्य नाही; ज्यात अनुभवाची निर्मळ उपस्थिती आहे. दोघांच्या 'आता'मध्ये एक खोल साम्य आहे. दोघेही सांगतात की मुक्ती ही भविष्यकाळातील घटना नसून या क्षणातच उपलब्ध आहे. 'आता' ची अनुभवक्षमता विकसित झाली की मनाच्या कालबद्ध हालचाली मूक होतात आणि चेतनेचा खरा स्पर्श उमलतो.

निसर्गदत्त आणि कृष्णमूर्ती यांच्या शिकवणीतील अजून एक अद्वितीय साम्य म्हणजे 'सत्याची अप्रमाणिकता'. त्यांच्या मतानुसार सत्य कोणत्याही ग्रंथाद्वारे प्रमाणित होऊ शकत नाही; ते कोणत्याही परंपरेने निश्चित केलेले नसते. सत्य हे कसोटीला धरून पाहण्याचे नव्हे; ते 'असण्याचे' आहे. दोघे जण सांगतात की सत्याचा शोध घेणारा शोधकर्ता जिथे आहे तिथेच सत्य आहे.त्याच्या स्वतःच्या चेतनेच्या केंद्रात !

या दृष्टीने दोघेही जण पारंपरिक अध्यात्मिक पद्धतींपेक्षा एका नवीन परंपरेचे प्रवर्तक आहेत, जिथे सत्य हे अनुभवात्मक, उलगडणारे, आणि अगदी वैयक्तिक स्वरूपाचे आहे.

भगवान श्री रमण महर्षींच्या महानिर्वाणानंतर आध्यात्मिक जगाला प्रश्नोत्तर स्वरूपात मॉरिस फ्रीडमन यांनी Glimpses of Maharshi ही एक उत्तम देणगी दिली. मुंबईस्थित सद्गुरु श्री निसर्गदत्त महाराजांनी दाखवलेला आत्मज्ञानाचा मार्ग भारताबाहेरील जगालाच काय, भारतातील लोकांना देखील फारसा माहीत नव्हता. मॉरिस फ्रीडमन यांनी त्यांच्या "आय एम दॅट" या प्रसिद्ध पुस्तकाने ती शिकवण जगभर पसरवली. दि. ९मार्च २०२६ रोजी फ्रीडमन यांच्या निधनाला पन्नास वर्षे पूर्ण झाली. या निमित्ताने श्री मॉरिस फ्रीडमन यांच्या स्मृती जागवत निसर्गवाणी त्रैमासिकाचे हे विशेष मुखपृष्ठ सद्गुरुभक्त श्री भरतभाई शिंपी यांनी तयार केले आहे. संपूर्ण निसर्गवाणी परिवाराकडून थोर विभूती श्री मॉरिस फ्रीडमन याना विनम्र आदरांजली.

श्री निसर्गदत्त समाधी
चॅरीटेबल ट्रस्ट

Nisargavaani

निसर्गवाणी ನಿಸರ್ಗವಾಣಿ निसर्गबानी

वर्ष २ रे अंक ४ था एप्रिल - जून २०२६

अ नु क्र म णि का

मॉरिस फ्रीडमन

'चैतन्य' (जाणीव)– जीवनातील स्थिर अधिष्ठान

एडिथ डेरी आणि निसर्गदत्त महाराज यांची कथा

पुर्वारंभ

'मी आहे' हेच माझे निजस्थान

परमपूज्य गुरुदेवता श्री कलावती माता

योद्धा संन्यासी : इंचगेरीचे श्री माधवानंद प्रभुजी

मॉरिस फ्रीडमन

ज्या ग्रंथामुळे श्री निसर्गदत्त महाराजांचे नाव जगभर पोहोचले, त्या ग्रंथाचे **I Am That** शीर्षक स्वतः महाराजांनीच निवडले होते. महाराजांचे दैनंदिन बोलणे मराठीत असले, तरी या ग्रंथाला कोणते नाव द्यावे असे विचारले असता त्यांनी तत्क्षणी इंग्रजीत उत्तर दिले — **"I Am That."** ही घटना १९७३ सालातील आहे. ही स्मरणीय आठवण मला श्री रमाकांत महाराजांनी सांगितली होती.

भक्त, प्रवासी व सत्याच्या शोधात असलेल्या जिज्ञासू साधकांनी विचारलेल्या प्रश्नांचा आणि त्यांना श्री निसर्गदत्त महाराजांनी दिलेल्या उत्तरांचा **I Am That** विस्तृत व अमूल्य संग्रह आहे. या ग्रंथाच्या निर्मितीमागे मॉरिस फ्रीडमन यांचा महत्त्वपूर्ण पुढाकार होता. निसर्गदत्त महाराज एकदा उद्गारले होते की, जसे पॉल ब्रंटन यांनी रमण महर्षींचा परिचय जगाला करून दिला, तसेच **मॉरिस फ्रीडमन** यांनी माझा शोध लावला.

मॉरिस फ्रीडमन यांचा जन्म १९०१ साली वॉर्सा येथे झाला. त्या काळात नेपोलियनी युद्धांनंतर पोलंडचे स्वतंत्र राष्ट्र म्हणून अस्तित्व लोपले होते आणि त्याचा प्रदेश प्रशिया, रशिया व ऑस्ट्रिया यांच्यामध्ये विभागला गेला होता. पहिल्या महायुद्धानंतर व्हर्साय तहाच्या निमित्ताने पोलंडचा स्वतंत्र राष्ट्र म्हणून पुनर्जन्म झाला. या नव्या स्वातंत्र्यप्राप्त पोलंडमधून तरुण मॉरिस उच्च शिक्षणासाठी पॅरिस येथील ला सॉरबोन विद्यापीठात गेले आणि तेथे त्यांनी अभियांत्रिकीचे शिक्षण संपादन केले.

लहानपणापासूनच त्यांनी जे काही कार्य अंगावर घेतले, त्यात स्वतःला अत्यंत तन्मयतेने वाहून घेतले; विशेषतः अध्यात्माकडे ! जे त्यांच्या पंचविसाव्या वर्षी जीवनाचे मुख्य केंद्र बनले. ज्यू कुटुंबात जन्म झाल्याने त्यांनी *तालमुद*चा अभ्यास

केला होता; त्यानंतर त्यांनी रशियन ऑर्थोडॉक्स चर्चचाही अभ्यास केला आणि पुढे ते थियोसॉफिकल सोसायटीशी जोडले गेले. तेथेच, १९२६ साली, त्यांची जे कृष्णमूर्तींशी भेट झाली आणि आयुष्यभर त्यांच्याशी त्यांचा निकटचा संबंध राहिला. भारतात आल्यानंतर ते भगवान रमण महर्षींचे शिष्य झाले. नंतर अनेक गुरुजनांना भेटल्यानंतर अखेरीस त्यांची श्री निसर्गदत्त महाराजांशी भेट झाली.

आपल्या या शोधयात्रेत त्यांनी कोणतीही तडजोड केली नाही. दुसऱ्यांनी सांगितलेले केवळ मान्य करून थांबणे त्यांना मान्य नव्हते; उलट, सत्याचा शक्य तितक्या थेट रीतीने स्वतः अनुभव घेण्याची त्यांची अखंड तळमळ होती. इतरांच्या धार्मिक गुंतागुंतीच्या भूलभुलैय्यात स्वतःला हरवून बसण्याची त्यांची अजिबात तयारी नव्हती; आणि या शोधासाठी करावा लागेल असा कोणताही प्रयत्न त्यांनी कधी टाळला नाही.

अभियंता म्हणून त्यांनी अनेक पेटंट्स विकसित केली आणि पॅरिसमधील वस्त्रोद्योगात काम केले. पुढे, १९२८ साली, ते एका फ्रेंच वीजकेंद्राचे संचालक झाले; आणि तेथेच त्यांच्या जीवनाला कायमचे वळण देणारी घटना घडली. १९३५ साली एके दिवशी म्हैसूर संस्थानातील एक मंत्री त्या केंद्राला भेट देण्यासाठी आले आणि त्यांनी फ्रीडमन यांना कर्नाटक राज्याच्या विकासकार्यांत सहभागी होण्याचे आमंत्रण दिले. त्यावर फ्रीडमन यांनी मंत्र्यांना सांगितले की, त्यांची बॅग तर आधीच भरून तयार आहे.

याच्या थोड्या आधी मॉरिस यांनी पॉल ब्रंटन लिखित *A Search in Secret India* हे १९३४ साली प्रकाशित झालेले पुस्तक वाचले होते, आणि त्या ग्रंथाने त्यांना अत्यंत खोलवर स्पर्श केला होता. ब्रंटन यांच्या या पुस्तकाचा परमोच्च बिंदू म्हणजे अरुणाचलमच्या — ‘लाल पर्वता’च्या — साधु रमण महर्षींशी झालेली त्यांची भेट!

ब्रिटिशांच्या अधिपत्याखाली भारताने पहिल्या महायुद्धात मोठे योगदान दिले होते. दहा लाखांहून अधिक भारतीय सैनिक या युद्धात सहभागी झाले होते, आणि त्यांपैकी एक लाखांपेक्षा अधिक जणांनी प्राण गमावले. देशातील संस्थानिक आणि स्थानिक शासक अधिक स्वायत्ततेची मागणी करू लागल्याने ब्रिटिशांना राजकीय सवलती द्याव्याच लागतील, हे स्पष्ट झाले. या पार्श्वभूमीवर १९३५ चा *Government of India Act* अस्तित्वात आला. तो कायदा जरी सत्तावाटपाचा आभास निर्माण करत असला, तरी प्रत्यक्षात त्याने वसाहतवादी स्थिती कायम ठेवली.

मॉरिस फ्रीडमन लवकरच भारताच्या स्वातंत्र्य चळवळीचे केवळ साक्षीदारच नव्हे,

तर स्वतः गांधीजीं समवेत सक्रिय सहभागी झाले. भारताशी त्यांच्या असलेल्या या अतिशय गाढ नात्याविषयी रमण महर्षींनी एकदा अत्यंत अर्थपूर्ण उद्गार काढले होते: "ते मुळात भारताचेच आहेत. योगायोगाने त्यांचा जन्म परदेशात झाला; परंतु ते पुन्हा इथे परत आले."

भगवान रमण महर्षी ज्या अरुणाचल पर्वतावर वास्तव्यास होते, त्या ठिकाणापासून सुमारे दोनशे किलोमीटर अंतरावर मॉरीस कार्यरत होते. संधी मिळेल तेव्हा ते तेथे जात असत. त्यांनी संन्यास स्वीकारला. भगवान रमण महर्षींनी त्यांना तसे न करण्याचा सल्ला दिला असतानाही त्यांनी संन्यासी वेश धारण केला. त्यांना '**भारतानंद**' हे नाव देण्यात आले, आणि पुढे त्यांनी आपल्या आध्यात्मिक लेखनासाठी हेच नामाभिदान वापरले. काहींच्या मते हे नाव त्यांना गांधीजींनी दिले, तर इतरांच्या मते स्वामी रामदास यांनी. गांधीजी जसे शुभ्र वस्त्रे परिधान करत आणि रामदास भगवे वस्त्र धारण करत, तसेच फ्रीडमन यांनीही काही काळ साधु बाह्य वेश स्वीकारला; परंतु पुढे जेव्हा या बाह्य चिन्हांचे महत्त्व त्यांच्या दृष्टीने लोपले, तेव्हा त्यांनी त्याही अवस्थेपलीकडे प्रस्थान केले.

बंगळुरूमधील एका औद्योगिक प्रकल्पाचे संचालक म्हणून कार्य करत असतानाही मॉरिस फ्रीडमन यांनी आपला संन्यासी वेश कायम ठेवला होता. यामुळे म्हैसूर संस्थानच्या मंत्र्यांशी मतभेद निर्माण झाले होते कारण अशा वेशातील संचालकाची अधिकृत पाहुण्यांसमोर ओळख करून देताना त्यांना संकोच वाटत असे. अखेरीस फ्रीडमन यांनी जवळच असलेल्या औंध या लहान संस्थानात स्थलांतर केले; पुढे हे संस्थान महाराष्ट्र राज्यात समाविष्ट झाले. तेथेच त्यांची आपा पंत यांच्याशी भेट झाली — जे पुढे एक ख्यातनाम मुत्सद्दी राजकारणी म्हणून ओळखले गेले.

१९३८ च्या सुमारास त्यांची गांधीजींशी भेट झाली आणि दोघांनी मिळून स्वशासनाच्या एका प्रयोगात्मक उपक्रमात सहभाग घेतला. या सहकार्यामुळे ब्रिटिश राजवटीतील एक वैशिष्ट्यपूर्ण संस्थान असलेल्या स्वतंत्र औंध राज्याची राज्यघटना तयार करण्याचे कार्य घडून आले. याशिवाय, काही काळासाठी मॉरिस फ्रीडमन यांनी या नव्या राज्याचे दिवाण, म्हणजेच पंतप्रधान, म्हणूनही कार्यभार सांभाळला.

फ्रीडमन यांच्या जीवनातील अधिक राजकीय टप्प्याचे गांधीजी प्रतीक ठरतात. आधुनिक भारताच्या राष्ट्रपित्यांच्या आदर्शांचा स्वीकार करून त्यांनी देशाच्या सामाजिक उन्नतीसाठी अथक परिश्रम घेतले. चरख्यावर बसलेले गांधीजी हे एक प्रसिद्ध छायाचित्र सर्वपरिचित आहे; तो चरखा मॉरिस फ्रीडमन यांनीच तयार केला होता. गांधीजींच्या विनंतीवरून त्यांनी पूर्वीच्या नमुन्यांपेक्षा तिप्पट वेगाने चालणारे

चरखे विकसित केले. अशा रीतीने, भारताच्या एका समर्थ राष्ट्रीय प्रतीकाला त्या पोलिश अभियंत्याच्या कुशल हातांचे नवे परिमाण प्राप्त झाले.

१९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाले. पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांचे गांधीजींशी निकटचे संबंध १९३१ पासूनच दृढ झाले होते. हे फ्रीडमन यांना आधीपासूनच चांगले ओळखत होते. पुढे दोघांनी मिळून एका अत्यंत गंभीर संकटाच्या काळात निर्णायक भूमिका बजावली : ती म्हणजे तिबेटवरील चीनचे आक्रमण. १९५९ साली माओ झेडोंग यांच्या सैन्याने तिबेटवर आक्रमण करून तेथील जनतेवर दहशतीचे सावट आणले, तेव्हा नेहरू थेट चीनशी संघर्ष उभा राहण्याच्या भीतीने साशंक होते. अशा वेळी तिबेटी जनतेला आश्रय द्यावा, यासाठी मॉरिस फ्रीडमन यांनी ठामपणे आग्रह धरला. या शोकांतिकेची चाहूल त्यांना आधीच लागली होती; म्हणूनच आक्रमण होण्यापूर्वीच तिबेटमधील पवित्र ग्रंथ भारतात आणून त्यांचे जतन करण्याची व्यवस्था त्यांनी केली होती.त्यानंतर दलाई लामांना सुरक्षितपणे भारतात आणण्यात आणि त्या वर्षी २४ एप्रिल रोजी त्यांची नेहरूंशी भेट घडवून आणण्यातही फ्रीडमन यांची मोलाची भूमिका होती. आपा पंत यांच्या सहकार्याने त्यांनी निर्वासितांसाठी अनेक वसाहती उभारण्याची सोय केली; त्यांपैकी धर्मशाला — हे पूर्वीचे ब्रिटिशकालीन हिल स्टेशन — विशेष उल्लेखनीय ठरले. आजही धर्मशाला हे दलाई लामांचे प्रमुख निवासस्थान आहे. भारतामधील तिबेटी समुदायाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त दलाई लामांनी फ्रीडमन यांच्याविषयी मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त केली. विशेषतः मुलांसाठी त्यांनी केलेले अविरत कार्य हे **“नैतिकदृष्ट्या आणि व्यावहारिकदृष्ट्या अमूल्य”** असल्याचे त्यांनी गौरवपूर्वक नमूद केले.

१९६० च्या दशकाच्या प्रारंभी, भारताच्या राष्ट्रीय स्वातंत्र्यलढ्याशी घट्ट निगडित असलेली खादी चळवळ मुंबईत पूर्णपणे विस्कळित अवस्थेत होती. अत्यंत गोंधळलेल्या परिस्थितीतही शिस्त आणि सुव्यवस्था प्रस्थापित करण्याची मॉरिस यांची विलक्षण क्षमता ओळखून, पंडित नेहरूंनी त्यांना या चळवळीची जबाबदारी स्वीकारण्याची विनंती केली. तो काळ बहुधा १९६३ च्या सुमाराचा असावा. मुंबईत त्यांची एक जुनी स्नेही आणि निष्ठावान भक्त राहत होती — मिस पेटीट, जिने त्यांच्या अखेरच्या दिवसांपर्यंत आपल्या घरी त्यांना प्रेमाने निवासासाठ स्थान दिले. हिला पेटीट (काही उल्लेखांत ‘हिरुबाई’ असेही नाव आढळते) यांना उच्च शिक्षणाची साधु मिळाली होती. त्या काळी अनेक स्त्रियांना तीदुर्मिळ होती. आणि त्यामागे मॉरिस यांचा महत्त्वाचा आधार होता. आपल्या दत्तक कन्या भुलालसह त्यांनी मॉरिस आणि आपा

पंत यांच्याबरोबर हिमालयातील अत्यंत कष्टप्रद प्रवास केले; तिबेटी निर्वासितां-च्या पुनर्वसनासाठी योग्य स्थळांचा शोध घेण्यासाठी त्या या मोहिमेत सहभागी झाल्या होत्या.

१९६४ साली नेहरूंचे निधन झाले. त्या वेळी पासष्ठ वर्षांचे मॉरिस फ्रीडमन पुढे बरेच काही साध्य करण्यास समर्थ आणि तत्पर होते. सुमारे १९६५ च्या सुमारास जे कृष्णमूर्तीही मुंबईत होते आणि त्यांच्या एका पुस्तकाच्या प्रकाशनाची तयारी सुरू होती. या पुस्तकाचे प्रकाशक होते चेतना पब्लिकेशन्सचे प्रमुख श्री सुधाकर दीक्षित. त्यांनी संपादनाच्या प्रक्रियेत सहकार्य करण्यासाठी मॉरिस यांना आमंत्रित केले. श्री दीक्षित यांच्या कन्या छाया आर्या यांच्या म्हणण्यानुसार, या दोघांची ओळख आपा पंत यांनी करून दिली होती. श्री दीक्षितांना मराठीचे पुरेसे प्रभुत्व नसल्यामुळे मॉरिस यांनी त्यांच्यासाठी दुभाष्याचे काम केले. सुधाकर दीक्षित हे अत्यंत प्रभावी व्यक्तिमत्त्वाचे होते — भारतीय संस्कृती आणि वेदान्त तत्त्वज्ञानाचे कट्टर पुरस्कर्ते होतेच आणि ते स्वतःही विद्वान होते. त्यांच्या जवळ विपुल ग्रंथसंपदा होती, आणि त्या ग्रंथांचा ते सखोल अभ्यास करीत असत.

एके दिवशी श्री दिक्षितांनी मॉरिस यांना सांगितले की, ते एका ज्ञानी पुरुषाशी त्याची भेट घडवून आणणार आहेत. खेतवाडी गल्लीतील तो आश्रम तेव्हा जवळजवळ वीस वर्षांपासून स्थिरावलेला होता. पुढे मॉरिस यांनी रमण महर्षींचे पणतू श्री गणेशन यांच्यासोबत मुंबईच्या रस्त्यांवर फेरफटका मारताना त्या पहिल्या भेटीची आठवण सांगितली. गणेशन यांनी ती जतन करून ठेवली; आणि त्यांच्यामुळेच ती आपल्यापर्यंत पोहोचली :

“मी काही लोकांना विड्या ओढत बसलेले आणि आपापली दुःखे सांगत असलेले पाहिले. तो साधासरळ मनुष्य त्यांना जसे उत्तर देत होता, ते अगदी रमण महर्षींनीच दिले असते असे वाटावे! रमण महर्षी मराठीत बोलले असते, तर ते असेच बोलले असते. मी क्षणभर जागच्या जागी थांबलो आणि अत्यंत लक्षपूर्वक ऐकू लागलो. एक साधा मनुष्य, विड्या विकणारा ! इतक्या गहन अधिकाराने बोलत आहे हे पाहून मी थक्क झालो.”

“महाराज सर्व प्रकारच्या अवडंबरांपासून पूर्णतः अलिप्त आहेत. त्यांनी स्वतःभोवती कोणतीही औपचारिकतेची किंवा विधीवत प्रतिष्ठेची भिंत उभारलेली नाही. ते एक साधे मनुष्य आहेत, जे साध्या लोकांना अत्यंत सहजतेने सत्याचा मार्ग दाखवतात. त्यांनी कोणताही मोठा आश्रम उभारलेला नाही, ना देणग्या गोळा

करण्याची त्यांची इच्छा आहे. ते महाराष्ट्राच्या संतपरंपरेतील आहेत. संसारी गृहस्थ, कर्मनिष्ठ, सरळ, मैत्रीत निष्ठावान आणि विवेकी मार्गदर्शक. एका अरुंद गल्लीतल्या साध्या निवासात ते आपल्या कुटुंबासमवेत राहतात आणि अत्यंत साधे जीवन जगतात. त्यांच्या घरात नजरेत भरणारी एकमेव गोष्ट म्हणजे त्यांच्या गुरूंची भव्य प्रतिमा; तिची ते दररोज काही शिष्यांसह भक्तिभावाने पूजा करतात."

जीन डन यांच्या शब्दांत, **"मॉरिस आपल्या महान गुरूंविषयी बोलताना त्यांना प्रेमळ, संवेदनशील आणि सूक्ष्म विनोदबुद्धी लाभलेले असे म्हणत. निसर्गदत्त महाराज पूर्णतः निर्भय आणि विलक्षण सच्चे होते; त्यांच्या दर्शनाला येणाऱ्या प्रत्येकासाठी ते प्रेरणा, दिशा आणि आधाराचे केंद्र होते."**

"मी दररोज आश्रमात जाऊ लागलो आणि महाराज जे काही बोलत, त्याच्या टिपा घेऊ लागलो. नंतर घरी परतल्यावर मी ते सर्व प्रश्नोत्तरे इंग्रजीत अनुवादित करीत असे." हे कार्य सुरू करताना परवानगी न घेतल्यामुळे मॉरिस यांच्या मनात काहीशी खंत होती; परंतु जेव्हा त्यांनी या विषयी निसर्गदत्त महाराजांना सांगितले, तेव्हा महाराज अतिशय प्रसन्न झाले. "चालू द्या, हे नोंदवणे सुरूच ठेवा," असे त्यांनी त्यांना प्रोत्साहन दिले. पुढे ह्याच नोंदी आणि अनुवाद एकत्र करून **I Am That** ग्रंथ साकार झाला.

ग्रंथाच्या तयारी दरम्यान निसर्गदत्त महाराजांच्या काही अत्यंत गुंतागुंतीच्या वाक्यांचा अर्थ उलगडण्यासाठी मॉरिस यांनी श्रीमती पेटीट यांची मदत घेतली. तसेच त्यांना श्री अरविंद काजी यांचेही सहकार्य लाभले. ते आठवण सांगतात : **"१९७० साली मॉरिस फ्रीडमन हे एका नगरपालिकेच्या आयोगाचे मानद सल्लागार म्हणून कार्यरत होते."** त्या काळात त्यांचे व्यावसायिक कार्य आणि महाराजांच्या उपदेशांचे भाषांतर हे अनेकदा एकमेकांत गुंफले जाई.

श्री अरविंद काजी निसर्गदत्त महाराजांकडे जाऊ लागले, कारण आपल्या परिचितांना सोबत घेऊन जाण्याची मॉरिस यांची सवय होती. सायंकाळी साधारण सहाच्या सुमारास अरविंद नेपियन सी रोडवरील कटगरा बिल्डिंगमधील मॉरिस यांच्या घरी जात असत. तेथे दोघे मिळून संवादांच्या ध्वनीमुद्रीत संवाद ऐकत. त्यानंतर अनुवादित मजकूर वाचून प्रत्येक मुद्द्यावर सविस्तर चर्चा केली जाई, जेणेकरून आशयातील अचूकता पूर्णपणे अबाधित राहील. १९७० च्या दशकाच्या प्रारंभी, हस्तलिखित जवळजवळ पूर्णत्वास आले तेव्हा मॉरिस यांनी ते प्रकाशनासाठी श्री दीक्षित यांच्याकडे सुपूर्द केले. **I Am That** ची पहिली आवृत्ती १९७३ साली प्रकाशित झाली आणि तिने आध्यात्मिक विश्वात एक विलक्षण स्पंदन निर्माण केले.

छाया आर्या यांच्या शब्दांत, **“I Am That ‘चेतना’ने भारतीय समाज आणि संस्कृतीला दिलेला सर्वांत मोलाचा वाटा आहे — ज्ञानयोग आणि वेदान्त तत्त्वज्ञानाचे अत्यंत गहन, परंतु सखोल व सुबोध असे दर्शन घडविणारा हा ग्रंथ आहे. त्याने केवळ भारतातच नव्हे, तर जगभर असंख्य जीवनांना कायमचे स्पर्शून रूपांतरित केले आहे; आणि पहिल्या प्रकाशनानंतर पाच दशकांहून अधिक काळ लोटल्यानंतरही त्याचे हे कार्य अविरत सुरू आहे.”**

पुस्तक पाश्चात्त्य जगतात इतके प्रसिद्ध कसे झाले?

याविषयी श्री गणेशन यांनी जीन डन; ज्या त्याकाळी रमणाश्रमात वास्तव्यास असलेल्या अमेरिकन पत्रकार व लेखिका होत्या त्यांना **I Am That** वाचण्याचा सल्ला दिला होता. सुरुवातीला त्या थोड्या साशंक होत्या; पण एकदा ग्रंथ वाचल्यानंतर त्या लवकरच निसर्गदत्त महाराजांना प्रत्यक्ष भेटण्यासाठी मुंबईला आल्या. त्यांनी *The Mountain Path* या रमणाश्रमातून प्रकाशित होणाऱ्या नियतकालिकासाठी एक अप्रतिम लेख लिहिला. हे नियतकालिक जगभर पोहोचत असल्याने ही वार्ता वणव्यासारखी झपाट्याने सर्वदूर पसरली. जणू एका रात्रीतच, खेतवाडी गल्लीतील त्या छोट्याशा आश्रमात परदेशी साधकांची वर्दळ वाढू लागली. पुस्तक वाचून, ज्याच्या चरणी पुढे गुरुत्व स्वीकारायचे होते, त्या पुरुषाच्या भेटीसाठी परदेशी साधक अक्षरशः बॅगा भरून मुंबईला निघाले !!

१९७६ साली मॉरिस फ्रीडमन यांना एका वाहनाची धडक बसली. ते वाहन मोटरसायकल होते की तीनचाकी, याबाबत भिन्न उल्लेख आढळतात. या अपघातानंतर ते अंथरुणाला खिळले आणि स्वतःची काळजी घेणे त्यांना शक्य राहिले नाही. त्यांच्याहूनही वयस्कर असलेल्या श्रीमती पेटीट यांना आवश्यक ती सेवा देणे अवघड झाले. पण १९५० साली जणू देह ठेवूनही रमण महर्षी आपल्या भक्तावर कृपादृष्टी ठेवून होते असे घडले.

एक परिचारिका होती. ती आपल्या रुग्ण सेवेसाठी मोठे मानधन घेत असे, तिला एका रात्री अत्यंत जिवंत भासणारे स्वप्न पडले. त्या स्वप्नात एका साधूने तिला स्पष्ट सांगितले : **“माझा भक्त दुःख भोगत आहे. जा, त्याची सेवा कर.”** इतकेच नव्हे, तर त्याने नेमका पत्ता सांगितला. ती परिचारिका जेव्हा तेथे पोहोचली आणि तिने आपली मदत देऊ केली, तेव्हा कठोर स्वभावाचे मॉरिस यांनी सुरुवातीला नकार दिला. त्यामुळे दुखावून ती निघण्याच्या तयारीत असतानाच तिची नजर भिंतीवरील भगवान रमण महर्षींच्या छायाचित्राकडे गेली. ती आश्चर्याने उद्गारली : **“माझ्या स्वप्नात मला दिसलेले**

तेच साधु हे आहेत!" हे ऐकून मॉरिस अतिशय अंतर्मुख झाले आणि म्हणाले: **"माझे गुरूच माझी सेवा करण्यासाठी आले आहेत."**

श्री आपा पंत मॉरिसना आपल्या गुरूस्थानी मानत, त्यांनी १९७५ साली निसर्गदत्त महाराजांची भेट घेतली. आणि आपल्या मित्राच्या अखेरच्या दिवसांत ते त्यांच्याजवळच राहिले. त्यांना एक तातडीचा निरोप मिळाला : **"साधु देह ठेवत आहेत, आणि त्यांनी तुमची आठवण काढली आहे, आपा. शक्य तितक्या लवकर या."** ते पोहोचले तेव्हा त्यांनी पाहिले की मॉरिस एका अशा खोलीत पडलेले होते कि जिथे सभोवतालची प्रत्येक वस्तू अत्यंत स्वच्छ, नीटनेटकी आणि सुबक रीतीने मांडलेली होती. डॉक्टर, परिचारिका आणि श्रीमती पेटीट यांनी त्यांना सांगितले की अन्न आणि औषधे दोन्ही मॉरिस नाकारत होते; त्यांच्या सर्व विनवण्या व्यर्थ ठरत होत्या. एकदा एखादा निश्चय झाला की त्यातून त्यांना कोणीही परावृत्त करू शकत नाही, हे सर्वांना ठाऊक होते. आपा पंत त्यांच्या शय्येजवळ गेले तेव्हा मॉरिस यांनी त्यांच्याकडे पाहून शांतपणे विचारले : **"आपा, कोण मरत आहे?"**

दुसऱ्या दिवशी मॉरिस यांनी सर्वांना खोलीबाहेर जाण्यास सांगितले; शेवटी फक्त आपा पंतच त्यांच्या जवळ राहिले. तेव्हा ते म्हणाले : **"आपा, मला संगीत ऐकू येत आहे; मला एक तेजस्वी प्रकाश दिसत आहे. कोण मरत आहे? कोणीही मरत नाही. हे आजारी शरीरच मला त्या सुस्वर सौंदर्यापासून दूर ठेवत आहे. मला या शरीरात अडकवून ठेवू नका. शांतपणे जाऊ दे."** त्यानंतरच्या दिवशी सर्वजण त्यांच्या अंतिम क्षणाचे साक्षी झाले. त्यांनी तीन संथ श्वास घेतले — **"हरी ओम... हरी ओम... हरी ओम..."** — आणि त्यांनी देह ठेवला. तो दिवस होता **९ मार्च १९७६.**

काही तासांनंतर निसर्गदत्त महाराजांच्या उपस्थितीत मॉरिस फ्रीडमन यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. निसर्गदत्त महाराजांच्या दृष्टीने **"मॉरिस हे ज्ञानी, संत आणि ऋषितुल्य पुरुष होते."** अंत्यसंस्कारानंतर महाराजांनी आपल्या आश्रमात मॉरिस यांच्या प्रतिमेला इतर भारतीय संतांच्या प्रतिमेसमवेत स्थान दिले.

परमावस्था

मॉरिस फ्रीडमन यांच्याविषयी अजूनही बरेच काही सांगण्यासारखे आहे; आणि पुढेही त्यात भर घालण्यासारखे अनेक पैलू उलगडत राहतील....अगदी परस्परविरोधी भासणारे तपशीलही !! कारण त्यांनी स्वतःमागे कोणतीही लिखित नोंद ठेवली नाही. ते विलक्षण स्पष्टदर्शी, करुणामय, विनम्र आणि अपार उदार मनाचे होते. त्यांनी शक्य

होईल तशी त्या त्या व्यक्तीला मदत केली. वंचित स्त्रियांच्या शिक्षणाला प्रोत्साहन दिले, मृत्युदंडाविरुद्ध आवाज उठविला, आणि कारागृहातील कैद्यांच्या जीवनमानात सुधारणा व्हावी यासाठी प्रयत्न केले. त्यांना पंधरा भाषा अवगत होत्या. त्यात अनेक भारतीय बोलीभाषा आणि अस्खलित मराठीचाही समावेश होता आणि त्यामुळेच त्यांना निसर्गदत्त महाराजांचे शब्द इंग्रजीत उतरवणे शक्य झाले. त्यांची बुद्धिमत्ता, भाषांवरील प्रभुत्व आणि अढळ जिद्द ही त्यांच्या असामान्य जीवनयात्रेची साधने होती.

मॉरिस फ्रीडमन यांच्यामुळेच श्री निसर्गदत्त महाराजांची वाणी पाश्चात्त्य जगापर्यंत पोहोचली. त्यांच्या अखंड चिकाटीशिवाय, भाषेतील अचूकतेशिवाय आणि गहन आध्यात्मिक ओळखी शिवाय, 'मुंबईतील तंबाखूविक्रेता' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या त्या ज्ञानी पुरुषाची शिकवण कदाचित मोजक्याच लोकांपुरती मर्यादित राहिली असती. एका लपलेल्या अमूल्य खजिना सारखी !

ही जीवनकथा मॉरिस फ्रीडमन आणि निसर्गदत्त महाराज यांना ओळखणाऱ्या सर्वांना, तसेच आजही त्यांच्या प्रकाशात

जीवन जगणा- यांना अर्पण केले गेलेले एक पवित्र पायसदान आहे.

– अँटोनियो प्लाना

आपण कोण ?..हा संशय समूळ नष्ट होईपर्यंत श्रवण करा.
केवळ श्रवणानेच मोक्ष घडतो असे सर्व साधू-संत सांगताहेत.
श्रवण काय केले ?..आपल्याजवळ आपण असल्याचे
ज्ञान आहे तेच जगाचे चित्र आहे.

– श्री निसर्गदत्त महाराज

‘चैतन्य’ (जाणीव)– जीवनातील स्थिर अधिष्ठान

श्री निसर्गदत्त महाराजांची शिकवण मी एका अमेरिकन सहकाऱ्याला समजावून सांगत होतो. आम्ही चीनमध्ये व्यवसायाच्या सहलीवर असताना आमच्यात ‘चैतन्य’ जाणीव या विषयावर चर्चा व्हायची, विशेषत: सगुण ब्रह्म- विरुद्ध निर्गुण ब्रह्म. अमेरिकन मित्राला संस्कृत शब्द समजणे थोडे कठीण होत होते. म्हणून आम्ही सगुण ब्रह्म (अर्थ ‘मी आहे) ‘लहान सी’ म्हणून, आणि ही लहानशी जाणीव चेतना आपल्या इंद्रियांच्या पलीकडे आहे. आम्ही निर्गुण ब्रह्माला आम्ही ‘मोठा सी’ असे लेबल लावले, कारण ते स्थायी स्वरूप आहे.

जाणीव ..चैतन्य हे अत्यंत सूक्ष्म ज्ञान आहे आणि ते समजणे कठीण आहे. बहुतेक लोक भौतिक जगात अडकलेले आहेत आणि द्वैत आणि बहुविधतेमध्ये गुंतून गेले आहेत. हे जीवनाचे रहस्य सांगणारे ज्ञान असे आहे की जर ती सूक्ष्म जाणीव, चेतना नसेल (लहान c) दिसणा-या जगाला अस्तित्व नाही. आपल्या मस्तकात जर चैतन्यरुपी जाणीव नाही.(लहान c) किंवा मी आहे ही जाणीव नसेल, ती जग भासण्यासाठीची पूर्व अट आहे.

खाली दिलेल्या चित्रात जागृती अवस्था दाखवली आहे. त्यात तुम्ही पाहू शकाल की सूक्ष्म जाणीव म्हणजे जाग आली जग दिसायला लागले. आणि जागृती अवस्था सुरु झाली. लहान ‘सी’ प्रकाशमन झाला की जग उदयाला आले, नान आकृती, ध्वनी, जागृती वगैरे. जाणीव जस जशी वागते स्मृतीत त्याची जंत्री तयार होते. काल रात्रीचे मागचे विचार मग विचारांची मालिका सुरु होते. आपण त्यात हरवून जातो.



खाली दिलेले चित्र आहे ती स्वप्नावस्था दर्शविते. तिथे जाणीव (c) पूर्ण प्रकाशाने भरून जाते. स्मृती पटलावर जमा झालेल्या आठवणी यांची एखाद्य चित्रपटासारखी हालचाल सुरु होते. आपण चित्रपट पाहतोय असे वाटू लागते आणि जणू आपणाला सूक्ष्म देह लाभला आहे वाटते.



आता, वादासाठी, म्हणूया, आपण आपली स्वप्न आणि जागृत अवस्था यांची तुलना करू शकतो आणि असा निष्कर्ष काढू शकतो की या दोन्ही मानसिक स्थितींमध्ये जाणीव किंवा चेतना हा एक स्थिर घटक आहे. मनाच्या जागृत अवस्थेत, आपल्या देह-मनासह भौतिक जग आपल्या चेतनेमध्ये (c) प्रतिबिंबित होते आणि या जागृत अवस्थांमध्ये स्मृतीचक्र चालूच असते.

मनाच्या स्वप्नावस्थेत, आपल्या शरीरासह भौतिक जगाची जाणीव होत नाही, आणि जाणीव एक स्वप्न जग आणि स्वप्न पाहणारा प्रोजेक्ट करते. तथापि, स्वप्न अवस्थेमध्ये मी आहे ची जाणीव अदृश्य असते. चेतना आणि त्याचा प्रकाश हे घडण्याची जाणीव करण्यासाठी एक सामान्य घटक आहे. जाणणे ही आपली शुद्ध अवस्था आहे तर पाहणारा आणि पाहणे ही कल्पनाशक्ती आहेत. जागृत आणि

स्वप्न या दोन्ही अवस्थांसाठी 'मी आहे' किंवा लहान c आवश्यक आहे. महाराजांच्या शिकवणीनुसार, साधकांनी या ज्ञानावर सतत विचार करणे आणि देह मनाच्या बंधनातून मुक्त होण्यासाठी 'मी आहे' या जाणीवे मध्ये सतत राहणे आवश्यक आहे.

आपले सर्वोच्च स्वरूप किंवा निर्गुण ब्रह्म किंवा मोठा 'C' हे निर्वाण तत्व आहे. आणि त्याला या मानसिक स्थितीं किंवा जग किंवा देह मनाचा स्पर्श सुद्धा होत नाही. लहान c मोठ्या C तून जन्माला आला आहे. आणि तो जागृत अवस्था निर्माण करतो. लहान c च्या हालचाल म्हणजेच स्वप्न आणि गाढ झोप अवस्था निर्माण होतात. मोठा C या सर्व अवस्थांचा साक्षी आहे आणि त्याला त्याचा स्पर्शही होत नाही. अवकाश आणि काळ फक्त लहान c मुळे जाणवते आहे. मोठ्या C त ते काहीच नाही.

जागे होण्यापूर्वी जाणीव..चेतना 'c' जागी असते हे तुम्हाला दिसत नाही, आपण भौतिक जगात जन्मलो आहोत' हे मूळ भ्रमाचे कारण आहे – 'आणि म्हणूनच कृष्ण म्हणतात 'सर्व प्राणी भ्रमात जन्माला आले आहेत'. हा मूळ भ्रम आहे. ज्ञानमार्गात ठोस आध्यात्मिक प्रगती करण्यासाठी हा भ्रम घालवला पाहिजे. मनुष्याचा जन्मा मिळाला ही अनोखी संधी ही आहे आपल्याला छोट्या 'सी' च्या सर्जनशीलतेचि ओळख करून घ्यावी लागेल. या जाणीवेत ..लहान 'सी' मध्ये स्थिर होणे कठीण आहे. शरीरात चैतन्य नसणे हे शरीराला जाणीव नाही आहे, देह हे चैतन्याची वस्तूरूप नव्हे. कागदाला एक छिद्र आहे ते कागदात दिसते पण ते कागदाचे नाही - निसर्गदत्त महाराज

देहात जाणीव आहे असे वाटते पण ती जाणीव देह नव्हे. जाणीव चैतन्याचे हे गुज खूप मौल्यवान आहे. खूप ऐकले पाहिजे. आणि ऐकले ते आत परावर्तीत झाले पाहिजे. त्याच्याने साधकाच्या वृत्तीत बदल होईल. देह-मनाच्या कक्षेतून तो बाहेर पडेल.

ही जाणीव किंवा चेतना ('c') हेच सगळ्याचे कारण आहे, ज्यामुळे सगळे दृश्यमान होते आणि अदृश्य होते. जर आपण देह-मन नव्हे तर केवळ चैतन्यरूप, जाणीवरूप आहोत असे मानून वागलो तर आपल्याला अनंत आशीर्वाद लाभतील.

एवढीच समजण्याची गरज आहे की जे काही घडते ते जाणीवेमध्ये ...चेतनेमध्ये उत्स्फूर्तपणे घडते.

– विश्वनाथ (विशी) संकरण

vishee.sankaram@gmail.com

एडिथ डेरी आणि निसर्गदत्त महाराज यांची कथा

एडिथ डेरी पॅरिसमधील एका नामांकित बँकेत लेखापाल म्हणून कार्यरत होत्या. दरवर्षी त्या आपल्या वर्षभरातील सर्व सुट्ट्या श्री रमणाश्रमात घालवत असत. त्या मुंबईला उतरून, तेथून मद्रासला (चेन्नईला) विमानाने जात आणि मध्ये कुठेही न थांबता पुढे टॅक्सीने थेट आमच्या आश्रमात येत. श्रीभगवान आणि त्यांच्या शिकवणीप्रती त्यांची निष्ठा अत्यंत गाढ होती. मला त्यांच्याविषयी विशेष आपुलकी वाटू लागली आणि मी त्यांना प्रेमाने माझी 'फ्रेंच आई' असे संबोधू लागलो! त्या देखील तितक्याच प्रेमाने मला 'माझा मुलगा' म्हणत.

जेव्हा त्यांनी 'द माउंटन पाथ' मध्ये प्रकाशित झालेले निसर्गदत्त महाराजांबरोबरचे माझे अनुभव वाचले, तेव्हा त्या अत्यंत व्यथित झाल्या. पुढील भेटीत त्यांनी मला अरुणाचल सोडून मुंबईला जाऊन दुसऱ्या गुरूंच्या सहवासात वेळ घालवल्याबद्दल फैलावर घेतले, त्यांनी मला विचारले, "श्रीभगवानांच्या शिकवणीत असे काय कमी आहे, की तुला त्या दुसऱ्या गुरूंची मदत घ्यावी लागली?"

त्या अत्यंत प्रभावी आणि ठाम व्यक्तिमत्त्वाच्या होत्या. मला स्पष्टपणे जाणवत होते की माझ्याकडून कितीही शब्दांत स्पष्टीकरण दिले गेले तरी ते त्यांच्या मनाला पटणार नाही. म्हणून मी शांतपणे त्यांना म्हणालो, "आई! मी तिथे का जातो हे खऱ्या अर्थाने जाणून घ्यायचे असेल, तर तुम्ही स्वतः महाराजांच्या सान्निध्यात राहिले पाहिजे. पुढील भेटीत मुंबईत एक दिवस थांबा, त्यांना भेटा आणि स्वतःच अनुभव घ्या." त्यांनी यावर संमती दर्शवली.

पुढील वर्षी, आश्रमातील पहाटेच्या पूजेवेळी अभिषेक चालू असताना,माझ्या पाठीवर प्रेमाने थोपटल्याची ऊब मला जाणवली. मागे वळून पाहिले तर ती माझी 'फ्रेंच आई' होती! त्यांच्या चेहऱ्यावर अपार आनंद झळकत होता. त्या घाईघाईने मला

बाहेर घेऊन गेल्या आणि अत्यानंदाने सांगू लागल्या — "माझ्या प्रिय मुला, तुझ्या सांगण्याप्रमाणे मी मुंबईत एक दिवस थांबले आणि महाराजांना भेटायला गेले. माझ्या मनात संताप उसळत होता. माझ्या मुलाला माझ्या श्रीभगवानांपासून दूर नेल्याबद्दल मी त्यांना जाब विचारणारच होते!"

मी सकाळी दहाच्या सुमारास महाराजांच्या घरी गेले. जिना चढून वर पोहोचले तेव्हा महाराजांसमोर आधीच मोठी गर्दी जमलेली होती. त्यामुळे मी शेवटच्या पायरीवरच जाऊन बसले. महाराजांनी हसून आणि मान हलवून माझे स्वागत केले. त्यामुळे मात्र माझा संताप अधिकच भडकला. तरीही मी स्वतःला आवरले आणि शांतपणे बसून राहिले.

महाराजांनी मला म्हटले, "काही प्रश्न विचारा." मी काहीच उत्तर दिले नाही. त्यांनी पुन्हा दोन–तीन वेळा आग्रह केला की मी काही तरी विचारावे. माझ्या मनात अस्वस्थता वाढू लागली. आणि शेवटी रागाच्या भरात मी उद्गारले, "मला तुम्हाला काहीही विचारायचे नाही. माझ्या मनात कोणताही संशय नाही."

तरीही महाराजांचा आग्रह काही थांबला नाही. मग मात्र मी खरोखरच संतापले आणि म्हणाले— "तुम्ही मला प्रश्न विचारायला का भाग पाडत आहात? तुमचे मोठेपण येथे जमलेल्या लोकांसमोर दाखवण्यासाठी का? म्हणजे मी एखादा प्रश्न विचारेन, तुम्ही त्याचे उत्तर द्याल आणि माझ्या तथाकथित संशयग्रस्त मनाचा भंग कराल—असेच ना? आणि मग येथे बसलेले सर्व लोक तुमची प्रशंसा करतील—हेच तुम्हाला हवे आहे ना? म्हणूनच तुम्ही इतक्या आग्रहाने मला प्रश्न विचारायला सांगत आहात का?"

मी निश्चितच उद्धटपणे बोलले होते; पण माझी चीड मी दडवू शकत नव्हते. तो सारा राग मला त्यांच्यावरच काढावासा वाटला. महाराज मात्र अखंड शांत आणि प्रसन्न होते. त्यांच्या चेहऱ्यावर एक अलौकिक करुणामय हास्य खुललेले होते आणि त्यांची कृपादृष्टी माझ्यावर स्थिर होती. माझ्या रागाच्या आणि असहिष्णुतेच्या उद्रेकाने ते किंचितही विचलित झाले नाहीत. काही क्षण त्यांनी एकाग्र दृष्टीने माझ्याकडे पाहिले. मग त्यांनी बोलायला सुरुवात केली—आणि शब्द जणू धबधब्यासारखे ओघळू लागले.

"माणसाची तहान भागली की नाही याची पाणी कधीही काळजी करत नाही!" महाराजांनी हे वाक्य हळूहळू, पण ठामपणे दोन-तीन वेळा उच्चारले — "पाणी कधीही माणसाची तहान भागली की नाही याची काळजी करत नाही!"

माझ्या अंतःकरणात काहीतरी अद्भुत घडत होते! माझा सर्व राग, निराशा आणि चिडचिड क्षणात नाहीशी झाली; आणि तिच्या जागी शांती, निःशब्दता आणि आनंदाचा अथांग सागर उसळून आला. या अनुभूतीने मला मनाच्या मर्यादांपलीकडे नेले आणि मी अपार आनंदाने भरून गेले. मी त्यांना भेटले, याचा मला अतिशय आनंद आहे. धन्यवाद, माझ्या 'मुला'! महाराज खरोखरच एक महान संत आहेत!"

– *Meetings with Sages and Saints*
(Lighthouses Guiding Seeker's Journey Within)
लेखक: व्ही. गणेशन
स्पॅनिश अनुवाद: अँटोनियो प्लाना (Antonio Plana)
(मराठी अनुवाद:स्मिता थोरात)

एकवेळ खोल समुद्रात बुडी मारतील, पण आपल्या जाणीवेत बुडी मारायला कोणी तयार नसतो. एकंदर जीव अधोदृष्टी आहेत. अधोगामी इंद्रियांच्या तृप्तीसाठी धडपडताहेत. विरळा कोणी ऊर्ध्वदृष्टीवाला भेटतो !

– श्री निसर्गदत्त महाराज

पुर्वारंभ

सद्गुरुसी जावें शरण । मनीं धरावें वचन । तेणें तुझें अज्ञान । जाईल बापा ॥७ ॥

टीका - सत्संगेंची भवगतप्राप्ती, म्हणून आधी सद्गुरूसी शरण जावें. त्या शरण जाण्याचा प्रकार पुढें स्पष्ट आहे.

सद्गुरूसी शरण होऊन, सच्छास्त्र, उपनिषद्भाग, श्रवण करावा; म्हणजे मनन निदिध्यास घडतो. जे 'मी ब्रह्म' हेंचि वचन मनीं धरावें. स्वस्वरूपाचें न जाणणें तेंचि अज्ञान. त्याचे निरसनार्थ 'मी ब्रह्म' हे वृत्तीच पाहि(जे) या नांव ज्ञान. तमासी तेज जैसें ग्राहक, तैसे अज्ञान ग्रासावया ज्ञानची समर्थ. तेंचि वचन दृढ धरावे.

(७) पुन्हा शिष्य प्रार्थिता जाला:

सद्गुरु कैसा ओळखावा। तो मज दातारें सांगावा । कोण उपदेश घ्यावा । तयापासी ॥८ ॥

टीका - या पृथ्वीतलाच्या ठाईं दांभिक मार्ग बहुत. तरी यथार्थ सद्गुरूचें रूप म्यां कैसें ओळखावें? आणि उपदेशाचे मंत्र यंत्रादि प्रकार बहुत, तरी म्यां सद्गुरूपासीं कोण (ता) उपदेश घ्यावा? हे कृपा करून 'दातारें', - निजरूपाने देणार म्हणून दातार मजला सांगावें. (८) आता सद्गुरुनाथ प्रतिवचन देतात -

ऐके सद्गुरुची खूण । क्रियेसहित ब्रह्मज्ञान । आशारहित निरभिमान । त्यासि मोक्ष मागावा ॥ ९ ॥

टीका - संक्षेपें सद्गुरूचीं चिन्हें सांगतात. मुख्य ज्ञान पाहिजे. ज्ञान म्हणजे स्वस्वरूप ज्ञान या नांव ब्रह्मज्ञान. 'पराभिज्ञ', लक्षणार्थ सक्रिय असावा; म्हणजे शांती, क्षमा, दया हेचि क्रिया.

धर्म-कर्मानुष्ठान हे क्रिया नव्हे. अथवा शिष्याची आशंका-छेदकरूप प्रबोधशक्ती, या नांव सक्रिय ज्ञान. हें जेथें असेल, तो सद्गुरु.

आता अन्य गुरु परद्रव्यापहारक, ते त्याची निरासपूर्वक बहिर्लक्षण सद्गुरुचि सांगतात- आशारहित स्वस्वरूपा-अतिरिक्त पदार्थमात्र नाहीं. येथे काय अप्राप्त आहे, म्हणून आशा होईल! तस्मात् ब्रह्मादि स्थावरान्त किंचितही आशा नाही. यास हेतू निरभिमानता, 'मी', 'तूं', हे बुद्धी गेली आहे ज्यापासून. (असा निरभिमान) सर्व मीच. मी-वृत्तिरहित निश्चय आहे ज्याचा. ऐसीया सद्गुरूस मोक्ष मागावा. मंत्रादी उपदेश जनरूढी, अंत:करण शुद्ध्यर्थ. तरी हे मुख्य अधिकारियाने टाकून मोक्षचि मागावा.

सद्गुरूपासी मोक्ष कसा म्हणसी तर ऐक. निरतिशय सुख तोचि आत्मा, तोचि मोक्ष. त्याची प्राप्ती ज्ञानद्वारा. जे प्रत्यगात्माचि ब्रह्म, हे इतके ज्ञान जाले, म्हणजे अज्ञानरूप बंधापासून सुटला. हाचि मोक्ष मागावा. सद्गुरु उपदेश करून, ज्ञानद्वारा मोक्ष देतात. सालोक्य, सामीप्यादी मुक्ती नव्हे. या मुक्ती नानात्वें उग्याच (उगीचच) अज्ञानजन बोधार्थ कल्पिल्या. तस्मात् मोक्ष येकरूप. तो सद्गुरूपासीच आहे, म्हणून मागावा.

उगाच मला मोक्ष कधी होईल, मला मोक्ष कधीं होईल, ऐसा मोक्ष न मागावा. तरी आता त्वरा करून, देहसामर्थ्य आहे, तोंचि सद्गुरूसी शरण जाऊन मोक्ष मागावा. कारण तापले लोखंडावर पाणी शिंपडल्यास (तें) जळायास जितका अवकाश, तितका अवकाश नरदेहास नाहीं. म्हणून अती त्वरित सद्गुरूस मोक्ष मागावा. त्या मोक्षाचे दृढीकरणार्थ शिष्य प्रार्थिताहे सद्गुरु.

मोक्ष कोणासि म्हणावें । हे मज स्वामीनें सांगावें । दया- सिंधू देवाधिदेवें । मज उपेक्षूं नये ॥ १० ॥

टीका - मागे, पुढे, आत, बाहेर, तळीं, उर्ध्व, सव्य, अपसव्य, जेथें, तेथें, आपण आपुलेपणानें, आत्मा एकजिनसी सारखाच आहे. कोठे सीमा नाही. शेवट नाही. म्हणून त्या स्वरूपाची सीमा करिताच येत नाही. कारण की, अमूप आहे. आत्माचि आत्मा परिपूर्ण (४३)

आता हाचि अभ्यास मंदप्रज्ञ भावार्थियाचे कृपेसाठी येथून बारा ओवीपावेतों

अन्वय-व्यतिरेकात्मक बोलतात. आणि आत्म्याची अनंत (ता) दृढ करितात. आणि मनासी स्वरूप अगम्य हेंही दृढ होतें. आणि जीवन्मुक्तीही दृढ होताहे. आणि शिष्यानें प्रश्न केला नसतां गुरुकृपारूप अमृत, अमृतासी पाजितात. ऐसे बहुत हेतू अंतरी दृढ करून स्वामी बोलतात-

जेथे मनाची धाव पुरे। पैलीकडे उदंड उरें। मन मग माघारें फिरे।
आलीया वाटे ॥४४॥
पाह्रो गेले जें दिशेशी। तें दिशा घालून पाठीशी ॥ सन्मुख धावें प्रयासी ।
अंत न लगे ॥४५ ॥
अष्ट दिशा पाहून आलें । मग तें ऊर्ध्वपंथें उडालें। नभ भेदुनिया गेलें।
पैलीकडे ॥४६॥
बहुत लंघिली पोकळी। भोवतें फिरें अंतराळीं । ऊर्ध्व मुखे तया वेळी।
अवलोकिते जाले ॥ ४७ ॥
निरावलंबी तें निराळे । सूक्ष्मरूपें पांगुळें । असंभाव्य देखूनि गळें ।
आवाका पोटी ॥४८ ॥
पुन्हा आलें आपुलें स्थळी । बुडी मारिली पाताळीं । सप्त पाताळाचे तळीं ।
अंत पाहे ॥ ४९ ॥
तव तें अत्यंत सखोल । बुडी दिधली बहुसाल । ठावचि नाही व्याकुळ ।
होऊन पडिलें ॥५० ॥
मग तेथून उफाळें। ऊर्ध्वमुखे अंतराळें । बहुत शिणलें न कळे।
अंत स्वरूपाचा ॥ ५१ ॥

टीका - (ओव्या ८) जेथे मनाची धाव पुरे, अंत स्वरूपाचा न कळे, येथे पावेतो पाह्यवे, आत्मा असंभाव्य, सीमाचि नाही, अमूप दशदिशा व्यापून ओतप्रोतपणे आहे, हेही सिद्ध जाले. आणि मनासी अगम्य, इतुके अष्ट दिशा ऊर्ध्वतळी फिरून श्रमलें. परी केवढे, किती, इतुके, तितुके, यासारखे, त्यासारखे ऐसें तैसें, किमपिही अंत लागला नाही. म्हणून मनासी अप्राप्त, श्रुती बोलिली हैं सत्य जाले. आणि ज्ञात्यासही निश्चय जाला; जें स्वरूपी जाणणें संभवतचि नाही. आणि जीवन्मुक्ताचें मन कोठेही गेलें, तरी स्वरूपावेगळा ठावचि रिता नाहीं. तेव्हा मन हे जावो, राहो, जीवन्मुक्तास संबंध नाहीं. त्याचा निश्चय कैसा आहे? आपण आत्मा. मनादी आपण स्वप्नीही वाटत नाहीं. मी जो

आत्मा, अनंत चैतन्य जीवन स्वरूप समुद्र. त्या माझ्या ठाई, हे कल्पनारूप मन हेचि लाटा. त्या मनोरूप लाटेसरिसें विश्वचराचर रूपे बुडबुडे उत्पन्न होऊन लयास जातात. तरी कालेकडून उत्पन्न होवोत अथवा कालेकडून लयाप्रती जावोत. परी मी जो अनंत त्या माझी हानी कोणती? अथवा लाभही कोणता ?

आता दुसरे रूपक, मी जो आत्मा, अनंत चिदाकाश, तेथें अज्ञानरूप माया हेचि मेघ. तेथे विद्युलतारूप हेंचि मन. काळरूपें वर्षाकाल. जग स्थावर जंगमात्मक हेचि पाणी. याचा वर्षाव होवो अथवा न वर्षो. मी जो चिदाकाश त्या माझी, काय हानी, अगर काय लाभ? कांही हानी-लाभ संभवत नाही. तस्मात् ऐसी जीवन्मुक्तता दृढ होती.

आता मंद-प्रज्ञ भावार्थी यास अभ्यास कैसा? अनुक्रमें बोलू. मंदप्रज्ञ म्हणजे परोक्ष कळले, परी अपरोक्षास विचार सुचेना. त्यास निदिध्यासरूपी अभ्यास. या आठ ओवीत व्यतिरिकेरूपे बोलिला तर साधकांनी ए (ये) कान्ती बैसावे, तेथें मनाचे जें अधिष्ठान तेथें लक्षांसे (लक्ष्यांसे) अवलोकावे, तें स्वरूप निरालंब, निराभास. गगनाचें परी प्रतीतीस येते. त्या आकाशीं मन सोडून द्यावें. अन्य विषय, कल्पनामात्र, विवेक-वैराग्य येणेंकडून निवारण कराव्या मग त्या आकाशीं मन फिरतें आणि त्या मनासी स्वसुखाची गोडी लागती (ते). तेणेकडून असंभावना, विपरीत भावना, नष्ट होतात. नंतर , विचारास मार्ग होतो. मग आत्मा अपरोक्षत्वें आपण आपणास प्राप्त होतो. ऐसी विज्ञानभक्ती या अभ्यासेकडून प्राप्त होते (ती), तरी हे साधकांनीं अगत्य अभ्यासावी. ऐसे या ओवीचे हेतू किंचित किंचित सांगितले. बहु बोलिल्यास विस्तार होतो. ऐसी विज्ञानभक्ती या अभ्यासेकडून प्राप्त होती (ते). तरी हे साधकांनीं अगत्य अभ्यासावी.

ऐसे या ओवीचे हेतू किंचित किंचित सांगितले. बहु बोलिल्यास विस्तार फार होईल. (४४, ४५, ४६, ४७, ४८, ४९, ५०, ५१) आता मनाचा आवाका क्षीण (शीण) जाला.

हे बोलतात-

स्वरूपार्णवीं फिरून आलें ।
तेणे बहुत निर्बुजलें । • हिनसुदे होऊन पडिलें ।
निःसत्वी अचेतन ॥* ५२ ॥
(* ज्याची शुद्ध हीन झाली - हरपली)

टीका - इतुका स्वरूपार्णव फिरून (मन) आले. अंत लागला नाही. आता प्रयत्न राहिला. मग 'हिनसुदी' होऊन निःसत्वी अचेतन पडिले. म्हणजे आपुली कल्पना सोडून

अधिष्ठानीं राहतें जालें. जैसे घाण्याचे ढोर ठाईच्या ठाई थकून बैसते, तयापरी (५२) (आता अन्वय बोलतात).

गेलें होतें ज्याचे शुद्धीशी। पाहे ते आपणाचि पासी । मग तें विस्मित, मानसीं। आश्चर्य करी ॥ ५३ ॥ (शोधासाठी)

टीका - ज्याच्या शुद्धीसी (मन) गेलें होतें, परी जो जो पुढे जाते, तो तो स्वरूप मागे मागे कैसें? मनानें पाहू जाता कळत नाहीं. मग पाहणें टाकून राहिलें. तेव्हा तें (तो) आपणाचि पासी, सन्निधचि, आपुलें अधिष्ठान, तै मग विस्मित होऊन आश्चर्य करितें जालें. काय हो, या वस्तूकरिता जप, तप, व्रत, नेम, पूजा, ध्यान, 'स्वरूप सन्निध', हें न जाणून व्यर्थचि केलें. म्हणे धन्य सद्गुरुमाय, स्वरूप मजला सुगमोपायानें दाखविले. तेणेंकडून कंठ सद्गद झाला. माझें आंगी रोमांच उठले. नेत्रीं प्रेमाचे पाझर चालिले. ऐसे अष्ट सात्त्विक भाव उठते जाले (५३) पुन्हा आश्चर्य बोलतें जालें.

जयासी इतुके धुंडिले । तें तो जवळीच देखिलें । आपणाकडे पाहू गेलें । तव तेचि आपण ॥५४ ॥

टीका - अहो, काय हो, इतुके धुंडिलें. ज्या वस्तूसी, ते वस्तू सन्निधचि देखिली. म्हणजे ज्ञानदृष्टीनें जाणिली. 'देखिला, 'जाणली' या शब्दे परोक्ष जाले. अपरोक्ष कैसे बोलतात? आपणाकडे पाहिले, तव ते स्वरूपचि आपण. जैसा सर्वचि अवघा रज्जू की घटचि अवघी मृत्तिका. की, अलंकारचि अवघे सुवर्ण। का दोराची अवघा कापूस. ऐसा आपणामध्ये आहे ब्रह्म भास, तेही ब्रह्म, आनंदही ब्रह्म. आपणासी ठिकाणची नाही. जैसे सर्प, घट, अलंकार, दोरा हे कधीही उत्पन्नचि जाले नाहीत. रज्जू, मृत्तिका, सुवर्ण, कापूस स्वतः सिद्ध आहेत. तैसा आत्माचि परिपूर्ण, मनादी कधीच उत्पन्न झाले नाहीत. ऐसे साधकास अभ्यासेकडून अपरोक्ष ज्ञान प्राप्त होते. ज्याची प्राप्ती त्यासीच घडे. येरा सर्वथा नातुडे. ऐसें मागें बोलिलें तें सत्य जालें. ज्याचें वेगळेपण मोडें, तयासीच प्राप्ती. मनादीकांचा वेगळेपणा अथवा साधकाचा साध्य साधकभाव, ज्याक्षणीं भिन्न भाव मोडला त्याच क्षणीं आत्मप्राप्ती. अपरोक्षता आणि अभिन्न समाधान, तें हेंचि. अंगें ब्रह्मचि आपण (५४)

आता ज्याची प्राप्ती त्यासचि जाली, हे दृष्टांत देऊन स्पष्ट करितात.

लवण अवघे सिंधू झालें । तैसे स्वरूपीं मिळालें। तेणें गुणें जोडलें ।
धनासी धन ॥५५ ॥

टीका - रज्जुसर्पादी दृष्टांत दिधले. त्याच रीती लवण अवघे सिंधू जालें. तैसें मन आपुला नि:सत्त्वपणा टाकून 'अस्ति भाति प्रियात्मक' जालें. स्वरूपचि अंगें जालें. जैसें धनासी धन जोडलें. धन शब्द ऐश्वर्य, आपुले सच्चिदानंदत्व, असज्जड दुःखत्वामुळें हरपलें होते. ते विचारे, सद्गुरुप्रसादे, सच्छास्त्र श्रवणें प्राप्त जालें. आता कृतकृत्यता जाली (५५)

आता सप्रतीत ज्ञानस्थिती हेचि करीत असतां बोलतात. दृढ

ऐसी स्वरूपाची स्थिती। स्वानुभवी ते जाणती । ये वस्तूची प्राप्ती।
सद्गुरुबोधे ॥ ५६ ॥

टीका - ऐसी स्वरूपाची स्थिती, ग्रंथारंभापासून ग्रंथ संपेतो, जें जें निरूपण जालें, ऐसी स्थिती. अथवा, काय हो अपूर्वता या स्थितीची? की, या स्थितीनें केवलाचें कैवल्य केलें. कोणीकडे देहबुद्धी, मी देह, माझा संसार, सुख दुःख, पापपुण्य इत्यादी आणि ब्रह्मबुद्धी सुखरूपता अनुभूती हे कोणीकडे ! मला कर्मदैन्यता कोणीकडे! आणि माझी निष्क्रियता कोणीकडे! हो ऐसी स्थिती, कर्मधर्म योगयागें नव्हे. ते स्थिती मजला सद्गुरुनाथे दिधली. अहो आश्चर्य, धन्य सद्गुरु, धन्य शास्त्र, धन्य प्राप्ती, अहो मी एकलाची दुसरेचि नाहीं. ओतप्रोतपणाने मजला म्याचि जाणिलें. इतरास ब्रह्मादिकांसी गोचर नव्हे. जैसा अहो तैसाचि अहो (आहे)! माझा (झ्या) ठाई किंचित विकार झालाचि नाही; आणि पुढेही होणार नाही. अहो हे ब्रह्मांड, अज्ञान, माया, कोणीकडे गेले हो? मजला मज वाचून काही दिसत नाही, की, अहो देव धुंडावयासी गेलो, तो मी स्वयें अंगें देवचि जा (झा) लों. ऐसी स्थिती आणि काही (काय) आश्चर्य या स्थितीचे, जे ध्यान केले तरी सारखी, न केले तरी सारखीच. जें समाधीत तेंचि उत्थानकाली; व्यापारातही तेचि स्थिती ! तैसीच मौनपणी, ते बोलताही; स्मरण करिता जे स्थिती तेचि स्थिती विस्मरणी. ओ काय हो आश्चर्य!

शंका - हेंचि ! स्थिती खरी, यासी प्रमाण काय? तरी स्वानुभवी ते जाणती. जे तत्त्वदर्शी सनकादी अथवा वर्तमानी साधू अथवा पुढे होणार साधू. ते साधू यासी साक्षी आहेत;

अथवा या स्थितीस जाणणारे धन्य ते साधू, स्वानुभवी. ज्या स्थितीत जीवन्मुक्ती, विदेहस्थिती, सहजस्थिती आपोआप होतात आणि नित्यमुक्तताही यापरता नाही. तस्मात् ऐसी स्वरूपाची स्थिती धन्य, आणि स्वानुभवी जाणती ते धन्य.

शंका - वादी कोणी करतात, जे तुम्ही इतुके स्थितीचें वर्णन केलें, आम्ही मुळा (ळ) पासून सर्व निरूपण ऐ (कि) कलें; परी आम्हांस का ऐसी स्थिती प्राप्त होत नाही? याचे उत्तर ये वस्तूचि प्राप्ती, सद्गुरुबोधे ऐसिये वस्तुरूप स्थितीचे प्राप्ती जया अंतरापासून गुरुभक्ती, त्यास सद्गुरु बोघेचि घडेल. उगेचि ग्रंथ पाहिल्यानें, विरक्ती नसता, गुरुभक्ती नसता, त्यास कधीही प्राप्ती घडणार नाही. म्हणून ज्यास अपेक्षा या स्थितीची, तेणें सद्गुरुपाद सेवावे. अंतरापासून गुरुभक्ती व्हावी (५६).*

शंका - हेचि स्वरूपस्थिती, तरी साक्षात् विषय जा (ज्या) अनिर्वाच्यता स्वरूपाची कैसी? या आक्षेपी बोलतात.

ऐसें स्वरूप ज्ञान । याही परतें समाधान । त्यास साक्ष आपुलें मन ।
अनिर्वाच्य तें ॥५७॥
जो स्वये सत्पुत्र जाला । जो सर्वांगे निवाला । निःशब्दी तया स्वानंदाला सांगताचि
न ये ॥ ५८ ॥
जे सांगता न ये, बोले । ते बोलेच प्राप्त जाले । सद्गुरु कृपेचि सखोले ।
अगाध वचनें ॥ ५९ ॥
सद्गुरु वचनी विश्वास । धरिता तुटती भावपाश । विनवी रामी रामदास ।
लडिवाळपणे ॥ ६० ॥

टीका - अहो हे शंकाकार, हे जे बोलिले स्थिती, अथवा निरूपण हें अवघें स्वरूपज्ञान. मुख्य समाधान जें यापरतें राहिलें. म्हणजे शब्द बोलता येतो परी अर्थ बोलता येत नाही. जैसी सा (ख) कर कैसी, पुसता 'गोड' म्हणून सांगतो, परी कैसी गोड? तिचा गोडपणा तो वेगळाच राहतो. सांगता येत नाही. तैसे 'हेही' शब्द . बोलता आले. परी अपरूप अर्थचि आहे. तेचि समाधान, यासी आपुले मनचि साक्षी. अनिर्वाच्य तें. श्रुती व अनुभवी बोलत होते कीं, अनिर्वाच्य ब्रह्म हें खरे प्रतीतीस आलें. यास आपुले मनाचि साक्षी ॥ शंका ॥ ५७ ॥

॥ **इति श्री पूर्वारंभ संपूर्णमस्तु** ॥

मी ‘मी आहे’ – ‘मी आहे’ हेच माझे निजस्थान

आजचे जग विशेषतः अराजकतेने भरलेले आहे आणि दिवसेंदिवस अधिकच अराजक होत चालले आहे. तथाकथित तांत्रिक प्रगतीमुळे मन अधिकाधिक व्यग्र झाले आहे; अनुभवाची खोली आणि परस्परांतील नाते हरवत चालले आहे. या सततच्या कोलाहलात आणि भारावून टाकणाऱ्या वातावरणात संवेदनशील आत्म्यांकडे एकच आसरा उरतो—स्वतःच्या अंतर्गत विश्वात आश्रय घेणे. आणि कधी कधी त्या प्रवासात सर्वात मौल्यवान असा खजिना सापडतो—**“मी आहे”! (I AM).**

अनिल चुबे यांच्याशी माझी ओळख माझ्या वडिलांमार्फत झाली. काही काळापूर्वी मला “I Am That” या पुस्तकाची मराठी प्रत मिळाली. ती त्यांना आवडेल असे वाटून मी त्यांना दिली. त्यानंतर त्यांनी माझी ओळख अनिल चुबे यांच्याशी करून दिली आणि आमची फोनवरून चर्चा झाली. निसर्गवाणी मासिकासाठी मी लेखन करण्याचा त्यांनी दिलेला सल्ला ऐकून मला अतिशय आनंद झाला. मी स्वतःला लेखक म्हणू शकत नाही—मी मुळातच कमी बोलणारा आणि अंतर्मुख स्वभावाचा आहे. शिवाय आध्यात्मिक गोष्टींच्या बाबतीत शब्द अत्यंत अपुरे ठरतात. तरीही, माझा हा प्रवास तुमच्यापैकी कुणाच्या तरी अंतःकरणाला स्पर्श करेल, अशी मला आशा आहे.

माझ्या आयुष्यातील बराच काळ मी बुद्धी, तर्क आणि विवेक यांच्याशी स्वतःची ओळख जोडून ठेवली. भावना आणि अनुभव यांच्यापेक्षा चिकित्सक विचारांना मी अधिक महत्त्व दिले. योगायोगाने, याच मार्गाने मला अद्वैत... म्हणजेच द्वैतभाव, याबद्दल रस निर्माण झाला. लहानपणापासून देव-देवादिकांच्या पारंपारिक संकल्पनेबद्दल मला अनेक प्रश्न पडत असत. पूजा-अर्चेच्या पद्धतींवरून माझे अनेक वाद व्हायचे आणि मी काही काळ नास्तिकतेकडेही झुकलो. परंतु एका प्रश्नाने माझ्या अंतर्मनाचे दरवाजे उघडले — **“जीवन इतकेच आहे का?”**

एक्हार्ट टॉल(Eckhart Tolle) यांच्या *Here and Now* (हिअर अँड नाऊ) या पुस्तकाचे वाचन म्हणजे जणू एकामागून एक खाली कोसळणाऱ्या अगणित डॉमिनोजची(छोटे आयाताकार चौकोनी तुकडे एकावर एक रचून खेळण्याचा एक प्रकार) सुरुवात ठरली. ते पुस्तक म्हणजे एखाद्या ताज्या, प्रसन्न वाऱ्याच्या झुळकीचा श्वास आत आल्यासारखे वाटले. आणि आपली आजवर खरी ओळख न झाल्याने मी आपण आपल्यावरच अनोळखीने लादून घेतलेले ओझे हलके होत चालले आहे याची जाणीव झाली.

त्यानंतर मी जसा जसा मागे मागे मागे जायला लागलो तसं तशी अर्थपूर्ण समृद्ध अनुभवांची एकामागून एक मालिका सुरू झाली. त्या अंतरंगातील प्रवासात मी रमण महर्षी, निसर्गदत्त महाराज, जे. कृष्णमूर्ती आणि अनेकांच्या मार्गदर्शनातून तिबेटी बौद्ध तत्त्वज्ञान आणि अद्वैताच्या अभ्यासात अधिक खोलवर शिरलो.

मला आठवतं, *Insight into Emptiness (इन्साइट इंटू एम्प्टिनेस), Awakening Challenge (अवेकनिंग चॅलेंज), Diamond Sutra (डायमंड सूत्र), Tibetan Book of the Dead (तिबेटन बुक ऑफ द डेड), Nan Yer (नान यार), Be Here Now (बी हिअर नाऊ)* इत्यादी ग्रंथ मी अक्षरशः झपाटल्यासारखे वाचत गेलो. त्यावर अंतर्मुख होत विचार करू लागलो की अधूनमधून आत्यंतिक अस्वस्थतेचा अनुभव येई. आणि त्या अनुभवाचे पुढे 'मी आहे'च्या स्फुरणांमध्ये रूपांतर होऊन अखेरीस एका "आऽहा" अशा आनंदमय अनुभूती येई.

प्रकर्षाने मला एक जाणीव झाली. कोणत्याही गोष्टीकडे बघण्याचा आपला विचार क्षणाक्षणाला बदलत जात असतो. काही मिळविण्यासाठी मनात क्षणात हुरूप येतो तर दुस-या क्षणात असुरक्षिततेची भावना आणि भीती यांवर ते उडून बसते. अशा रीतीने एका सत्यनित्यातून अनेकादिक वेगवेगळ्या कथा तयार होत राहतात. मुठीतून सटकणा-या वाळूच्या कणांप्रमाणे या सतत बदलणाऱ्या कथांच्या कॅलिडोस्कोपमध्ये (बहुरंगी दृश्यात) माणूस सहज स्वत:मध्ये हरवून जातो. श्वास आणि इंद्रियांच्या सजग अनुभूतीसोबत अशा वेळी केवळ **'मी आहे'** ही जाणिव पकडून राहणे हाच एकमेव आधार उरतो. हा सराव जसजसा वाढीला लागतो , तस तसे मायेचे स्वरूप अधिकाधिक स्पष्ट होत जाते. आणि हा मायारूपी भ्रमाचा पडदा जसजसा विरळ होत जातो, तसतशी बाळगलेली ओझी हलकी होत जातात.; मायाबंधांतून होत जाणारी मुक्तता अनुभवास येते, ज्यायोगे नृत्यमय जीवनाचा आनंद घेण्याची क्षमता सहज प्राप्त होते.

तथापि या आकलनासोबत काही धोके पण उद्भवतात उदाहरणार्थ: निराशा ! मन आपल्या संस्कारानुरूप सुखी प्रापंचिक जीवनाच्या कल्पनेशी या नव्याने आलेल्या अनुभूतीची तुलना करण्याचा प्रयत्न करते आणि नाराज होते. व्यवहारिक जगाबद्दल असलेल्या आपल्या कल्पना आणि आपले अनुभव हे केवळ विचारांच्या पातळीवरच अस्तित्वात असतात. आणि आपण असल्याचा प्रत्यक्ष अनुभव—जो अत्यंत खरा, व्यक्तिनिष्ठ आणि क्षणोक्षणी असतो, यांच्यामध्ये प्रचंड फरक आहे. जसे एखाद्या विमातातून पॅराशूटच्या सहाय्याने उडी मारायची केवळ मनात कल्पना करणे आणि प्रत्यक्ष विमानातून उडी मारणे—या दोन गोष्टी पूर्णपणे भिन्न आहेत!

जेव्हा आपल्या व्यावहारिक कल्पना आणि आपले प्रत्यक्ष स्वरूप या मधील फरक ओळखतो तेव्हा समाजात रूढ अर्थाने मानलेल्या महत्त्वाकांक्षा, यश, वैभव आणि समाधान इत्यादीला मग काहीच अर्थ उरत नाही. मग आपला रोजचा व्यवहार तरी कसा आपण पार पाडवा ?

प्रश्न निर्माण झाले की त्यातून मनाच्या संस्काराप्रमाणे आणखी आणखी चौकटी निर्माण होतात, ज्यामुळे शेवटी चिंता आणि काळजी वाढीला लागते. 'मी आहे' या जाणिवेवर लक्ष केंद्रित करून स्थिर राहणे. आपला श्वासोच्छवास आणि प्रत्यक्ष आपले असणे हेच आपल्याला अयोग्य मार्गांपासून दूर नेऊन चिरशांतता, आनंद आणि आत्मप्रेमाचा मार्ग सापडण्यासाठी मदत करते. ही संपूर्ण प्रक्रिया म्हणजे जणू बीजांना पाणी घालून रोपटी अंकुरण्याची प्रतीक्षा करण्यासारखी आहे. बीज लगेच अंकुरले नाही तर लगेच प्रयत्न सोडून देण्याजोगे ते होईल !

मी अजूनही या अध्यात्मिक यात्रेच्या अगदी प्रारंभी उभा आहे. मला यातले काहीच समजत नाही याची जाणीव मला आहे; परंतु माझ्या स्वानुभवाच्या आधाराने पुढची वाटचाल करण्यासाठीची माझी तळमळ आहे. अंतिम सत्य हे इथेच आणि आत्ताच आहे; परंतु त्याची खऱ्या अर्थाने प्रचीती यावी...जबरदस्तीने नाही... या प्रक्रियेवर संपूर्ण विश्वास, पारमार्थिक शिकवण अनुसरणे आणि स्वरूपावरची आवरणे गळून पडू देणे एवढेच !!

– मयूर यादव

परमपूज्य गुरुदेवता श्री कलावती माता

|| ॐ नमः शिवाय ||
|| श्री सद्गुरूनाथ महाराज की जय ||
|| परमपूज्य गुरुदेवता श्री कलावती माता की जय ||

माझ्या माहेरी, मी अगदी लहान असल्यापासून, आमच्या शेजारी मोघे नावाचे कुटुंब रहात होते. त्यांच्याकडे नित्यनेमाने, सकाळ-संध्याकाळ, आईंची (श्री कलावती माता) उपासना होत असे. आईंची भजने, आरती, बालोपासना (छोटी पुस्तिका) यांचे पठण काकू मनातल्या मनात नाही तर सुस्पष्ट, सुस्वर व मोठ्या आवाजात करत असत. आम्ही चाळीत रहात असल्यामुळे त्यांच्या घरातील उपासना स्पष्ट ऐकू येत असे.

"गुरु माझा मी गुरूंचा | दास त्यांचा बहुजन्मीचा ||
चरणी जडले मन हे माझे | आता कवणा घालू मी ओझे ||

यासारखी, तसेच 'गुरुवाचुनी दैवत नाही' अशी बरीचशी भजने ऐकायला मिळत. भजन ऐकता ऐकता, का ते माहीत नाही, पण माझे डोळे नकळत भरून यायचे आणि वाहू लागायचे. त्या भजनांची व आरत्यांची मला आवड निर्माण झाली. माझी ही आवड लक्षात आल्यामुळे मोघे काकू मला देवळांमध्ये बरोबर घेऊन जायला लागल्या. मीही अगदी आवडीने त्यांच्याबरोबर जायला उत्सुक असायचे. नकळत माझे मन भजन, उपासना याकडे ओढले गेले. मला एक प्रकारचे मानसिक समाधान लाभू लागायला सुरुवात झाली होती.

सकाळी व संध्याकाळी दिवेलागणीला देवापुढे दिवा लावण्यापलीकडे आमच्या घरी देवा-धर्माची फारशी कोणालाच आवड नव्हती; पुजाअर्चा, उपासना तर फार दूरची गोष्ट राहिली.

बालपण मागे पडले. मला जसजसे समजू लागले तसतशी मी स्वतःला खूप भाग्यवान समजू लागले. 'कलावती आई' मला गुरु म्हणून लाभाव्यात ही खरोखर खूप भाग्याची गोष्ट आहे आणि त्या बाबतीत मी खरंच भाग्यवान आहे. आईंचा अनुग्रह मात्र मी खूप उशिरा म्हणजे लग्न झाल्यानंतर घेतला. पण आईची सेवा करण्याची शक्ति मला मात्र खूप वेळा मिळाली. सेवा करत असताना तसेच इतरही प्रसंगी बऱ्याच वेळा... आई आता देहरूपात हयात नसल्या तरी, माझ्या जवळपासच आहेत अशी माझ्या मनाची धारणा आहे .

मला असे वाटते की आईंची उपासना करायला लागल्यापासून मला कसलीही उणीव भासली नाही किंवा कोणत्याही उणिवेची जाणीव झाली नाही. आईचा अनुग्रह घ्यायची माझी खूप इच्छा होती पण अनुग्रह कसा मिळेल, मिळेल की नाही असे वाटत असे. पण तोही प्रश्न आईंनी सहजगत्या जुळवून आणला.

त्याचे असे झाले की लग्न झाल्यानंतर काही वर्षांनी आम्ही ठाण्याहून निवासी विभाग, डोंबिवली येथे राह्यला गेलो. उपासनेसाठी मी डीएनसी शाळेजवळील मंदिरात जात असे. एके दिवशी, 'ज्यांची अनुग्रह घेण्याची इच्छा असेल त्यांनी नावे द्यावीत' असे मंदिरातून सांगण्यात आले. आम्हां सात भगिनींना अनुग्रह घेण्यासाठी बेळगावला पाठवले. बेळगाव येथील हरी मंदिरात २००२मध्ये महाशिवरात्रीच्या पवित्र दिनी अनुग्रह घेण्याचा योग आला.

जीवनात प्रार्थनेचे महत्त्व इतक्या छान पद्धतीने परमपुज्य आईंनी पटवून दिले आहे की त्यामुळे सकाळी देवपूजा केल्याशिवाय मनाला समाधान वाटत नाही. आईंची शिकवण खूप मोठी आहे. आईंच्या शिकवणीतून मला खूप काही गोष्टी अंगी बाणवता आल्या, समजू लागल्या.

थोडक्यात सांगायचे तर प्रार्थना करणे हे प्रत्येक मानवाचे कर्तव्य आहे. प्रार्थना ही नित्यनेमाने तसेच ती प्रेमाने केली पाहिजे. प्रार्थनेत ऐहिक किंवा पारलौकिक सुखाचा शक्ति नसावा. 'हरि'शी एकरूप होणे शक्ति एकच उद्देश असावा. प्रार्थनेत बहिर्रंगापेक्षा अंतरंग रंगले पाहिजे. प्रार्थना जर मनापासून केली तरच ती देवाजवळ रुजू होते. भवरोगाचे – संसाररूपी रोगाचे – निवारण होण्यासाठी पथ्यही सांभाळले पाहिजे. आपल्या हातून घडलेली चूक देवापुढे कबूल करायला हवी. आहार घेण्यात नियमितपणा असावा, कोणाच्याही वर्मावर बोट ठेऊन त्याला दुखवू नये. उणीदुणी काढू नयेत. आजचे काम आज करावे, उद्यावर ढकलू नये, लावालावी करू नये, आळसाला देऊ नये, वायफळ बोलण्यात वेळ घालवू नये, वाईट विचारांना मनात देऊ

नये. तसेच प्रत्येकाने जीवनात थोडा तरी परोपकार, फळाची अपेक्षा न करता करावा. देव, गुरु तसेच संतांपुढे सत्य बोलावे, नम्र असावे. नियमित प्रार्थनेने कुसंस्कार निघून जाण्यास मदत होते. पापाचे क्षालन होते, दुर्गुणांचा नाश होतो. सदगुण अंगी बाणतात. पुण्याचा साठा होतो, माणूस पशुवृत्ती पासून दूर जाऊन मनुष्यपण अंगी बाणते. हृदय किंवा मन आरशासारखे स्वच्छ निर्मळ बनते. कोणत्याही कठीण परिस्थितीत मनाची अखंडता भंग पावत नाही.

संसारामध्ये सु:खदुःखं तर येणारच, पण त्यांना तोंड देण्याची शक्ति आपल्याला गुरुच्या उपासनेमुळे मिळते. आपल्यावर ओढवण्या-या संकटांची तीव्रता कमी होते. उपासनेमुळे मनातील भ्रम नाहीसे होतात. उपासना आत्मसूर्याचे दर्शन घडवते.

|| श्री सद्गुरुनाथ महाराज की जय ||

– सौ शामल विष्णु यादव, ठाणे

चिंता आणि भय नाही असा एकही दिवस उगवून मावळणार नाही. ज्याला भय नाही असा माणूसच नाही. एखाद्या काळात भय नसेल, पण तो काळ बदलला की भय आहेच!
विष का घेत नाही ?..तर, मरणाचे भय आहे.
विष का घेतात ?..तर जगायचे भय आहे.

– श्री निसर्गदत्त महाराज

योद्धा संन्यासी :
इंचगेरीचे श्री माधवानंद प्रभुजी

१९७० च्या दशकात निसर्गदत्त महाराज सर्वपरिचित झाले तेव्हा त्यांच्या जीवनपद्धतीने अनेकांना आश्चर्य वाटले. ते मुंबईत संसारी गृहस्थ म्हणून राहणारे, बीड्या ओढत आणि कधीकधी तीव्र रागही व्यक्त करणारे. अशा त्यांच्या स्वःभाव वैशिष्ट्यांनी आध्यात्मिक गुरू कसा असावा याबद्दलच्या सर्वसाधारण अपेक्षांना त्यांचे व्यक्तिमत्व आव्हान देणारे होते.

श्री माधवानंद प्रभुजी यांचे जीवनही अशाच प्रकारचे होते. ते निसर्गदत्त महाराजांचे समकालीन तसेच त्यांचे गुरुबंधू होते. श्री भाऊसाहेब महाराज आणि त्यानंतर श्री गिरिमल्लेश्वर महाराज यांच्या नवनाथ इंचगेरी परंपरेतले होते. प्रभुजी ब्रह्मचारी होते आणि सातत्यपूर्ण ध्यानमग्नतेत राहणारे साधक होते; तरीही त्यांनी धाडसाने व्यापक देशातील ब्रिटीश राजवटी विरुद्ध प्रतिकारात सहभाग दिला होता. देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात अनेकदा कारावास भोगला होता.

प्रभुजींच्या जीवनकथेचा माझा प्रथम परिचय अलीकडील इंचगेरी भेटीदरम्यान झाला. तेथे मठाच्या भिंतीवरील त्यांच्या पूर्णाकृती चित्राने माझी उत्सुकता वाढवली. एका छोट्या चौकशीने सुरुवात झालेली गोष्ट पुढे कन्नड, मराठी आणि इंग्रजी स्रोतांच्या आधारे त्यांचे जीवन पुनर्रचित करण्याच्या प्रयत्नात रूपांतरित झाली.

अर्ध-पौराणिक व्यक्तिमत्त्वांबाबत जसे अनेकदा घडते, तसे येथेही भक्तीयुक्त कथनांमुळे काही तथ्ये वाढवून सांगितली गेली असावीत किंवा सूक्ष्मरीत्या बदलली असावीत. म्हणून खालील निवेदन शक्य तितक्या ठिकाणी दस्तऐवजीकृत घटनां आणि पारंपरिक कथनांमध्ये भेद करण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रारंभीचे जीवन

माधवानंद प्रभुजी यांचा जन्म २ नोव्हेंबर १९१५ रोजी कर्नाटकातील हुबळी येथे महादेवप्पा मुरुगोड या नावाने झाला. ते शिवप्पा मुरुगोड आणि काळम्मा यांचे दुसरे सुपुत्र होते. त्यांचे वडील, वंशपरंपरेतील गुरु म्हणून ओळखले जाणारे शिवप्रभू महाराज, हे श्री गिरिमल्लेश्वर महाराजांचे शिष्य होते. त्यामुळे महादेवप्पा लहानपणापासूनच एका आध्यात्मिक गुरूच्या निकट संपर्कात आणि शिस्तबद्ध साधनेच्या वातावरणात वाढले.

विविध वृत्तांतांनुसार त्यांनी अत्यंत लहान वयातच आध्यात्मिक परिपक्वतेची चिन्हे दाखवली. काही कथांमध्ये ते तीन ते आठ वर्षांच्या दरम्यान गुरु-मंत्र प्राप्त झाल्याचे सांगितले जाते—जे साधकासाठी अत्यंत लवकर मानले जाते. अचूक वय काहीही असो, त्यांच्या बालपणात त्यांना अंतर्मुखतेची तीव्र ओढ होती, ज्यामुळे पारंपरिक शालेय शिक्षण त्यांना अनुरूप वाटत नव्हते. उपजीविकेसाठीचे शिक्षण त्यांना "ध्यानयोग"—स्वानुभूतीच्या ध्यानमार्गाच्या तुलनेत आकर्षक वाटत नव्हते .

सुरुवातीला या अंतर्मुख ओढीमुळे ते शाळेच्या रात्री घराबाहेर जाऊन स्मशानभूमीत ध्यान करीत असत. लवकरच ध्यानाकडे वाढत गेलेल्या या आकर्षणामुळे त्यांनी चौथी इयत्तेच्या सुमारास (सुमारे दहा वर्षांच्या वयात) शाळा सोडली. त्यांनी दीर्घकाळ एकांत साधनेसाठी गुहा, स्वतः बांधलेल्या पानांच्या झोपड्या किंवा गुरूंच्या सूचनेनुसार श्री गुरुलिंगजंगम महाराजांच्या समाधीजव निवारा शोधला .

परंपरेत वारंवार सांगितली जाणारी एक कथा त्यांच्या शिस्तीचे तसेच समाजाने त्यांच्या साधनेची लवकर ओळख कशी केली याचे उदाहरण देते. हुबळीहून इंचगेरीकडे पायी यात्रेदरम्यान श्री गिरिमल्लेश्वर महाराजांनी आपल्या शिष्यांना प्रत्येक श्वासाबरोबर गुरु-मंत्राचे अखंड स्मरण ठेवण्याची आज्ञा दिली. काही दिवसांनंतर त्यांनी ती आज्ञा पूर्णपणे पाळणाऱ्यांना उभे राहण्यास सांगितले, तेव्हा फक्त एकटा बारा वर्षांचा महादेवप्पा उभा राहिला. त्याची अविचल एकाग्रता पाहून गुरूंनी त्याला "दैवी स्वरूपाचे खरे प्रगटीकरण" असे संबोधल्याचे सांगितले जाते. त्यानंतर लोकांनी त्याला देवरू ("दैवी व्यक्ती") असे संबोधण्यास सुरुवात केली.

एका स्रोताच्या मते, चौदा वर्षांच्या वयात कठोर तपश्चर्या आणि एकांत साधनेनंतर त्यांना आत्मसाक्षात्कार झाला. इतर काही वृत्तांतांमध्ये ते बाल्यापासूनच आत्मसाक्षात्कारी किंवा "अवतारी पुरुष" असल्याचे वर्णन केले आहे . अचूक

कालावधी निश्चित सांगता येत नसला तरी बहुतेक वृत्तांत असे सुचवतात की त्यांच्या आध्यात्मिक परिपक्वतेची ख्याती अत्यंत लहान वयातच निर्माण झाली होती.

या कथा प्रतीकात्मक मानल्या किंवा प्रत्यक्ष घटना मानल्या, तरी त्या एक गोष्ट स्पष्ट करतात—महादेवप्पा केवळ भक्तिमान नव्हते, तर त्यांच्या वयापेक्षा कितीतरी अधिक अंतर्मुख परिपक्वता त्यांच्यात दिसून येत होती.

भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील भूमिका

माधवानंद प्रभुजींची राजकीय जागरुकता भारताच्या स्वातंत्र्यलढ्याच्या तीव्र होत जाणाऱ्या प्रवाहासोबत घडली. २६ जानेवारी १९३० रोजी पूर्ण स्वराज्याची घोषणा आणि सविनय कायदेभंग चळवळीची सुरुवात झाल्यानंतर देशभर प्रतिकाराची लाट पसरली. याच काळात चौदा वर्षांचे प्रभुजी इंचगेरी या भक्तिपरायण गावात प्रथम राजकीयदृष्ट्या सक्रिय झाले.

पुढील काही वर्षांत त्यांच्या गुरूंच्या आशीर्वादाने त्यांचा राजकीय सहभाग वाढत गेला. १९३० च्या दशकाच्या अखेरीस त्यांनी कर्नाटक आणि महाराष्ट्रातून हजारो लोकांना १९३८ मधील हरिपुरा येथील भारतीय राष्ट्रीय काँग्रेस अधिवेशनाला उपस्थित राहण्यासाठी प्रेरित केले . एका कथनानुसार अधिवेशनाच्या तिसऱ्या दिवशी प्रभुजी उभे राहून म्हणाले: ***“स्वातंत्र्य हा आमचा जन्मसिद्ध हक्क आहे; धार्मिक स्वातंत्र्य राजकीय स्वातंत्र्याशिवाय प्राप्त होऊ शकत नाही.”*** एका संन्याशाने विसाव्या दशकात केलेली ही घोषणा विशेष ठळक घटना ठरली .

या कार्यामुळे प्रभुजींचा संपर्क सुभाषचंद्र बोस आणि महात्मा गांधी यांसारख्या राजकीय नेत्यांशी आला. त्यांच्या कार्याने प्रभावित होऊन बोस यांनी हुबळीतील इंचगेरी परंपरेच्या आश्रमात त्यांची गुप्त भेट घेतल्याचे सांगितले जाते. गांधीजींच्या परवानगीने प्रभुजींनी १९४१ मध्ये इंचगेरी आणि आसपासच्या गावांमध्ये शांततामय सामूहिक आंदोलन सुरू केले, ज्यामुळे त्यांना पहिली अटक झाली.

१९४२ च्या “भारत छोडो” आंदोलनानंतर त्यांच्या समूहाचा प्रतिकार अधिक कठोर स्वरूप धारण करू लागला. हजारो स्त्री-पुरुषांचा समावेश असलेल्या या समूहाने ब्रिटिश पायाभूत सुविधांना लक्ष्य केले—रेल्वे स्थानके नष्ट करणे, पोलिस ठाण्यांवर हल्ले करून त्यांना जाळणे, मालवाहू डबे रुळावरून घालवणे, तारयंत्रांच्या तारा तोडणे आणि खजिन्यातील निधी जप्त करणे. या व्यापक क्रियाकलापांचे अचूक आकडे

सांगणे कठीण आहे. विशेष म्हणजे, कोत्तलगी आणि सोन्याळ येथे स्वसंरक्षणासाठी दोन शस्त्रनिर्मिती केंद्रे उभारण्यात आली होती ; तरीही त्यांच्या समूहाने मानवी जीवितहानी कमी ठेवण्याचा सातत्यपूर्ण प्रयत्न केला.

या क्रांतिकारी मोहिमेत त्यांना वारंवार अटक झाली. आयुष्यात प्रभुजींना सत्तावीस वेळा कारावास भोगावा लागल्याचे सांगितले जाते. त्यांनी कारागृहाला “गुरूंचे घर आणि देवाचे मंदिर” असे संबोधले, कारण तेथे त्यांना अखंड ध्यानाची संधी त्यांना मिळत असे. तुरुंगात असतानाही त्यांनी गुप्तपणे नेतृत्व सुरू ठेवले, आणि त्या काळात काही कारागृह अधिकाऱ्यांनीही त्यांचे शिष्यत्व स्वीकारल्याचे उल्लेख आढळतात.

एक ब्रह्मचारी आध्यात्मिक गुरु विध्वंसक कारवायांशी जोडला जावा हे प्रथमदर्शनी आश्चर्यकारक वाटू शकते. तथापि, त्यांच्या नैतिक दिशा आणि नेतृत्वाची प्रेरणा त्यांनी सर्वोच्च कल्याण मानलेल्या ध्येयासाठी केलेल्या पूर्ण समर्पणातून आली होती.

स्वातंत्र्यानंतरची सामाजिक चळवळ

१९४७ मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाल्या नंतर सुद्धा प्रभुजींची देशसेवा कार्य थांबवले नाही. ब्रिटिश सत्ता संपल्यानंतरही भारतीय उपखंड शेकडो संस्थानांमध्ये विभागलेला होता. “देश सेवा ही ईश सेवा” या घोषवाक्याखाली प्रभुजींनी तरुणांना संघटित केले आणि हैदराबाद संस्थानाचे भारतात विलिनीकरण, गोव्यातील पोर्तुगीज सत्तेविरुद्धचा संघर्ष आणि कर्नाटकाच्या एकीकरणासाठी सक्रिय प्रचार केला. या कार्यात मोठे धोके होते: हैदराबादच्या संघर्षात त्यांच्या समूहातील काही सदस्यांवर गोळीबार झाला , गोव्यात अधिकाऱ्यांनी त्यांना मारहाण केली, आणि कर्नाटक एकीकरण आंदोलनात त्यांनी एकवीस दिवसांचे आमरण उपोषण केले.

स्वातंत्र्यानंतर राजकारणात वाढत चाललेल्या भ्रष्टाचार आणि स्वार्थामुळे निराश झाल्यावर प्रभुजींनी लोक सेवक संघ पक्षाची स्थापना केली, ज्याचा उद्देश निकृष्ट शासनाला विरोध करणे आणि त्यावर नियंत्रण ठेवणे हा होता. १९६४ मध्ये त्यांनी विनोबा भावे प्रेरित सर्वोदय भूदान चळवळीतही सहभाग घेतला. भारतभर पायी फिरत त्यांनी गावोगाव जाऊन भूमिहीनांसाठी पडीत जमिनींचे पुनर्वाटप करण्याचा प्रचार केला. त्यांच्या कार्यकर्त्यांनी हजारो एकर जमीन भूमिहीनांना मिळवून दिली.

त्यांच्या कठोर पद्धतींचे उदाहरण म्हणून एक प्रसंग वारंवार सांगितला जातो. एका कथनानुसार त्यांच्या समूहाने उमराणी नावाच्या स्थानिक जमीनदाराला ताब्यात

ठेवले आणि त्याला फक्त कोरडे व अतितिखट अन्न देत राहून अखेरीस त्याच्याकडून बहुतांश जमीन दान करून घेतली. भक्तांमध्ये प्रसिद्ध असलेली ही कथा सर्वोदय भूदान चळवळीच्या आदर्शांसाठी प्रभुजी किती तीव्रतेने प्रयत्नशील होते याचे द्योतक मानली जाते.

इंचगेरीतील त्यांच्या दूरदृष्टीची अंमलबजावणी

राजकीय प्रतिकारासाठी ते ओळखले जात असले तरी माधवानंद प्रभुजी हे मठाधीश म्हणून धार्मिक विधी, शिक्षण आणि समुदायाच्या आध्यात्मिक जीवनाची जबाबदारी सांभाळत होते. त्यांच्या दैनंदिन जीवनात कठोर शिस्त होती—दिवसातून चार वेळा भजनांचे नेतृत्व करणे, प्रवचन देणे, तीन तास ध्यान करणे, लोकांना भेटणे, मठाचे व्यवस्थापन आणि प्रत्येक श्वासाबरोबर पवित्र मंत्राचे अखंड स्मरण. वर्षातून तीन वेळा आठवडाभर चालणारे 'सप्ताह' ते आयोजित करत. ज्यात्यात प्रार्थना, प्रवचन आणि सामूहिक भोजनासाठी हजारो लोक एकत्र येत आणि गरीबांनाही भोजन दिले जाई.

परंपरागत मठाची जबाबदारी सोबत त्यांनी आधुनिक सामाजिक विचारांचाही स्वीकार केला. स्वातंत्र्यलढ्यात नाशिकच्या तुरुंगात असताना त्यांचा परिचय समाजवादी विचारवंत कॉम्रेड एस. ए. डांगे यांच्याशी झाला, ज्यांच्या समतेवरील विचारांचा त्यांच्यावर दीर्घकालीन प्रभाव पडला. साम्यवादाच्या काही तत्त्वांबरोबरच विनोबा भावे यांच्या सर्वोदय विचारांपासून प्रेरणा घेत १९६७ नंतर त्यांच्या नेतृत्वाखाली मठात सामूहिक मालकी आणि जमिनीच्या पुनरुत्थानाचा प्रयोग सुरू झाला.

बाराव्या शतकातील संत बसवन्न यांच्या समतेच्या तत्त्वांनुसार त्यांच्या सामाजिक दृष्टीचा विस्तार जात आणि धर्म यांच्या पलीकडे होता. मठात आपल्या आयुष्यात त्यांनी २५,००० पेक्षा अधिक आंतरजातीय आणि आंतरधर्मीय विवाह घडवून आणले—ज्यात लिंगायत, दलित, ब्राह्मण, मुस्लिम, ख्रिश्चन आदी समुदायांचा समावेश होता. या कार्यामुळे त्यांना विरोधही झाला. त्याला उत्तर म्हणून प्रभुजींनी स्वतःच्या नात्यातील कलम्मादेवी यांचा विवाह एका मुस्लिम तरुणाशी लावून दिला . याशिवाय विधवा विवाह, देवदासी विवाह, बेघरांना आश्रय, अंधश्रद्धेविरोधी मोहिमा, मद्यविरोधी प्रचार आणि गोहत्याबंदीची चळवळ अशा अनेक उपक्रमांत त्यांनी सहभाग घेतला.

या प्रयत्नांमुळे महात्मा गांधींचे नातू अरुण गांधी यांनी इंचगेरीला भेट दिली. त्यांनी

तेथील कृषी विकास आणि समताधिष्ठित सामुदायिक जीवनशैलीचा अभ्यास केला. त्यांच्या *Imprint* वृत्तपत्रातील लेखात ते म्हणतात:

> **“जिथे उर्वरित भारत जात आणि धर्माच्या अंधाऱ्या सावलीत झाकोळला आहे, तिथे राष्ट्रीय जीवनातील असे धाडसी प्रयोग केवळ टिकून राहोत असेच नव्हे तर लवकरच सर्वत्र पसरावेत अशी आपण सर्वांनी आशा करावी.”**

माधवानंद प्रभुजींच्या व्यक्तिमत्त्वाचे वर्णन

त्यांच्या कारकिर्दीची आणि कर्तृत्वाची यादी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा केवळ एक भाग दर्शवते. प्रबळ इच्छाशक्ती आणि परिस्थितींना आपल्या ध्येयाकडे वळविण्याची क्षमता असूनही, विविध वृत्तांत वैयक्तिक जीवनात अत्यंत साधे आणि स्तुतीपासून दूर राहणारे म्हणून त्यांचे वर्णन केले गेले आहे.

जेव्हा त्यांच्या स्तुतीपर महामंगलआरती गायली जाई तेव्हा ते भक्तांना रागावून थांबवत. कोणी त्यांच्या चरणांना वंदन करण्याचा प्रयत्न केला तर ते त्यांना थांबवून “जा आणि ध्यान करा” असे सांगत. ‘समर्थ सद्गुरू’ सारख्या उपाध्या स्वीकारण्यास त्यांनी नकार दिला; संन्याशांचे केशरी वस्त्र धारण करणे, मिरवणुक, पालखीत बसणे किंवा छायाचित्र काढणे—या सर्व गोष्टी त्यांनी टाळल्या. ते स्थानिक खादीचे—कधी कधी फाटके वस्त्र परिधान करत विहिरी स्वच्छ करणे, शौचालये साफ करणे, स्वतः शेती करणे किंवा चरख्यावर खादी सूत कातणे अशी कामे करत. स्वातंत्र्यानंतर स्वातंत्र्यसैनिकांसाठी सरकारकडून देण्यात येणारे निवृत्तीवेतनही त्यांनी नाकारले.

आध्यात्मिक गुरु म्हणून त्यांची प्रवचने शांत, गंभीर आणि तरीही मोहक असल्याचे वर्णन केले जाते. साध्या भाषेत आणि उदाहरणांद्वारे त्यांनी *दासबोध* किंवा *मनाचे श्लोक* यांसारख्या ग्रंथांतील वेदान्त तत्त्वांचे विवेचन केले, जे अशिक्षित श्रोत्यांनाही समजण्यास सुलभ होत असे.

अनेक अनुयायांसाठी हा साधेपणाच त्यांच्या आध्यात्मिक गूढतेची पुष्टी देणारा होता. तरुणपणी श्री गिरिमल्लेश्वर महाराजांनी केलेल्या त्या घोषणेनंतर भक्त त्यांना अनेकदा “चालता-बोलता देव” असे संबोधत असत. त्यांच्या अखंड ध्यानमग्नतेचा आणि सर्वांप्रती करुणेचा उल्लेख करत. एका कथेनुसार मठात चोरी करताना

पकडलेल्या चोरांना शिक्षा देण्याऐवजी प्रभुजींनी त्यांना पंधरा दिवस तेथे काम करण्यास सांगितले, ज्यामुळे त्यांची शिक्षा सुधारणा आणि शिस्तीच्या रूपात बदलली.

त्यांचे वडील शिवप्रभू महाराज देखील त्यांच्याकडे विशेष आदराने पाहत असत असे सांगितले जाते. एका कथेत स्मशानभूमीत ध्यानमग्न बसलेल्या तरुण महादेवप्पाच्या मानेभोवती सर्प गुंडाळलेला त्यांनी पाहिल्याचा उल्लेख आहे, ज्यामुळे त्यांच्या मुलाचे आध्यात्मिक सामर्थ्य विलक्षण असल्याचा त्यांचा विश्वास दृढ झाला. पुढील काळात काही चमत्कार भक्तांना आश्चर्यचकित करत. प्रभुजींच्या पावलांच्या धुळीने स्वतःचे कपाळ स्पर्श करीत. १९६७ मध्ये वडिलांच्या निधनानंतर प्रभुजी औपचारिकरीत्या मठाचे प्रमुख झाले; परंतु त्यापूर्वी अनेक दशके त्यांच्या वडिलांनी त्यांनाच मठाच्या कार्याचा प्रभूजींचा अधिकार ओळखून त्यांचे आदेश ऐकले. कोणी विचारल्यास ते फक्त एवढे म्हणत: “तो कोण आहे हे मला माहीत आहे”.

निर्याण आणि वारसा

मानवतेच्या सेवेसाठी वाहिलेल्या माधवानंद प्रभुजींच्या जीवनात सतत प्रवास, अनियमित आहार आणि अल्प विश्रांती यांचा समावेश होता. कालांतराने त्यांच्या शरीराला थकवा जाणवू लागला; तरीही त्यांनी आपले कार्य थांबवले नाही. २५ मे १९८० रोजी, एका सप्ताहातून परतताना, हुबळीत त्यांनी देह ठेवला.

त्यांनी रोवलेल्या कार्याचे बीज आजही अपेक्षित फळ देत आहे. त्यांनी स्थापन केलेल्या तीन शाळांमधून, त्यांनी सुरू केलेल्या ज्ञानयोग आश्रमांमधून आणि इंचगेरीतील आजच्या पिढीतून आजही सार्वजनिक प्रयोगाला पुढे नेत आहे. त्यांच्या योगदानासाठी कर्नाटक सरकारने २००६ साली त्यांना मरणोत्तर सुवर्ण कर्नाटक राज्योत्सव पुरस्कार प्रदान केला आहे.

यूट्यूबवर प्रसारित होणाऱ्या शेकडो प्रवचनांमधून इंचगेरीतील ऐंशी फूट उंच समाधी मंदिरात दररोज गायल्या जाणाऱ्या भजनांमधून, त्यांच्या जीवनावर आधारित क्रांतियोगी महादेवरू या चित्रपटातून आणि अविरत भक्तीने त्यांची स्मृती जपणाऱ्या आजच्या हजारो अनुयायांच्या घरगुती पूजास्थानांमधून त्यांची विदेही उपस्थिती सूक्ष्म स्वरूपातही टिकून आहे.

ज्या काळात संतत्व आणि राजकीय क्रांती यांपैकी एकाची निवड करावी लागते

असे मानले जात होते, त्या काळात प्रभुजींनी हा भेद मान्य केला नाही. त्यांच्या दृष्टीने सर्वोच्च उन्नती ही आध्यात्मिक आणि राजकीय मुक्ती—दोन्हींच्या संयोगात आहे.

ते म्हणत असत "जय जगत,"—संपूर्ण जगाचे कल्याण होवो !!

– **Ilkin Mengusoglu**

University College, London

REFERENCES:

1. Malagond TK, Savalu A. I*nchageri Adhyatma Sampradayada: Krantiyogi Sadgurugulu: History and Achievements* [Kannada]. Hubballi: S V Prints; 2023.

2. Burade SDM. *Amrut Dhara* [Marathi]. Inchageri: Shri Girish Prakashan; 1992.

3. Bhandare SNB. *Inchagiri Sampraday Divya Parampara*. 2nd ed. [Marathi]. Tembhurni, Solapur: Diamond Printers; 2021.

4. Prakash OS, director; Shegunasi M, writer. *Kranthiyogi Mahadevaru* [Kannada]. Hubballi, Karnataka: Sri Girimalleshwara Films; 2018. 188 min.

5. Revansiddheshwar Maharaj. Oral communication. Head of Inchageri Matha, Shri Kshetra Inchageri Matha; 2026.

6. Arali V. Oral communication. Devotee of Madhavananda Prabhuji, Shri Kshetra Inchageri Matha; 2026.

7. Hasilkar M. Oral communication. Devotee of Madhavananda Prabhuji, Shri Kshetra Inchageri Matha; 2026.

8. *Pūrna Swarāj Resolution*. Encyclopaedia Britannica [Internet]. Available from: *https://www.britannica.com/topic/Purna-Swaraj-resolution*. Accessed 2026 Mar 13.

9. Jangawad MP, Nandana GB. Role of Samartha Sadguru Madhavananda Prabhuji of Inchageri Matha in the Indian Independence Struggle. *Indian Streams Research Journal*. 2015;5(5). Available from: *https://oldisrj.lbp.world/UploadedData/6713.pdf*

10. Kampunavar S. Personal communication. Reporter, Vijayapura; 2026.

11. Hiremath G. Oral communication. Devotee, Shri Kshetra Inchageri Matha; 2026.